



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक १६९ * नांदेड * शुक्रवार, दि. २६ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# व्हेनेझुएलात दोन मोठे भूकंप, इमारती पत्त्यासारख्या कोसळल्या

## १० हजार लोकांचा मृत्यू झाल्याची भीती



**कराकस (प्रतिनिधी)–** व्हेनेझुएलाची राजधानी आणि सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या कराकस शहराला बुधवारी संध्याकाळी भूकंपाचे दोन शक्तिशाली धक्के बसले. ७.१ आणि ७.५ रिश्टर स्केल क्षमतेच्या भूकंपाच्या या धक्क्यांनी कराकस शहरातील इमारती आणि घरे अक्षरश: पत्त्यासारखी कोसळली. या दुर्घटनेत तब्बल १० हजार नागरिकांचा मृत्यू झाल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

बुधवारी संध्याकाळी सहा वाजण्याच्या सुमारास कराकस शहराला हे भूकंपाचे धक्के बसले. या शक्तिशाली भूकंपानंतर काही नागरिक त्यांच्या घरांमधून बाहेर पडत धावत रस्त्यावर आले. हे भूकंपाचे धक्के इतके शक्तिशाली होते की, अनेक इमारती पूर्णपणे कोसळल्या आहेत. कराकस शहरात फक्त इमारतींचे ढिगारे उरले आहेत. लोकांना आसरा घेण्यासाठीही जागा शिल्लक राहिलेले नाही. त्यामुळे काल भूकंपाच्या धक्क्यानंतर येथील नागरिकांना रात्रभर रस्त्यावरच राहावे लागले.

व्हेनेझुएलाचे गृहमंत्री डियोस्डाडो काबेयो यांनी दिलेल्या माहितीनुसार, कराकस शहरातील अल्तामिरा भागात सर्वाधिक नुकसान झाले असून तेथील परिस्थिती चिंताजनक आहे. या परिसरातील अनेक इमारती आणि घरं पडली आहेत. भूकंपाचे आणखी हादरे बसू शकतात, या शक्यतेने सरकारने लोकांना पुन्हा घरात जाऊ नये, अशी सूचना दिली होती. या दुर्घटनेत हजारो नागरिक जखमी झाल्याची माहिती आहे.

नॅशनल हॉलिडे असल्यामुळे भूकंपावेळी अनेक लोक आपल्या घरी उपस्थित होते. स्थानिक वेळेनुसार संध्याकाळी ६.०४ वाजता भूकंप आला. भूकंपाचे केंद्र कराकासच्या पश्चिमेला मोंटालबान क्षेत्रात होते. हा झटका इतका तीव्र होता की कोलंबियाची राजधानी बोगोटापर्यंत याचे हादरे जाणवले. या झटक्यांची तीव्रता त्रुजिलो, याराकुई, काराबोबो, अरागुआ, मिरांडा, कराकास आणि ला गुआइरा या ठिकाणी जाणवली.

एका मिनिटात भूकंपाचे दोन शक्तिशाली धक्के बसल्यामुळे कराकस शहराची वाताहात झाली आहे. हे भूकंपाचे धक्के इतके शक्तिशाली होते की, मोठमोठ्या इमारती गदागदा हलून जमीनदोस्त झाल्या. हे दृश्य पाहताना अनेकांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. भूकंपाचे धक्के बसले तेव्हा लोकांना जमिनीवर उभे राहणेही मुश्कील झाले होते.

## अवकाळी पावसाने बाधित शेतकऱ्यांना ३३४ कोटी ९८ लाख रुपयांची मदत

**मुंबई (प्रतिनिधी)–** एप्रिल व मे २०२६ या कालावधीत राज्यातील विविध भागांमध्ये झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि नैसर्गिक आपत्तीमुळे शेती पिके तसेच फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या संकटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक दिलासा देण्यासाठी राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने ३३४ कोटी ९८ लाख रुपयांच्या मदतीस मंजुरी दिली आहे.

यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. राज्यातील कोणताही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, नुकसानग्रस्तांना वेळेत आधार मिळावा आणि शेती पुनर्बांधणीला बळ मिळावे, या भूमिकेतून मदत व पुनर्वसन मंत्री नामदार मकरंद जाधव-पाटील यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय मार्गी लागला आहे. शासन निर्णयानुसार राज्यातील २ लाख ६७ हजार ६५६ शेतकरी आणि १ लाख ६३ हजार ७८८.७५ हेक्टर क्षेत्र अवकाळी पावसामुळे बाधित झाले असून त्यांच्यासाठी ही मदत मंजूर करण्यात आली आहे.

# शिवसेना खासदार संजय दिना पाटील यांचा मुजोरपणा

## पत्रकारांनी प्रश्न विचारल्यावर शिवीगाळ आणि मुजोरीची भाषा, पत्रकारांना धमकी

**मुंबई (प्रतिनिधी)–** शिवसेना ठाकरे गटातून निवडून आल्यानंतर त्यांची साथ सोडून शिंदे सेनेत सामील झालेले ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांना आता पत्रकारांचे प्रश्नही बोचू लागले आहेत. राजकीय प्रश्नांवर प्रतिक्रिया विचारणाऱ्या पत्रकारांना संजय दिना पाटील यांनी गुरुवारी शिवीगाळ केली. तुम्ही परत इकडे आलात तर मी तुम्हाला मारुन पाठवेन. हे कॅमेऱ्यात रेकॉर्ड करा, परत आलात तर मारुन पाठवेन. हे मी तुम्हाला पोलिसांसमोर सांगतोय, तुम्हाला करायचंय ते करा, अशी अरेरावीची भाषा संजय दिना पाटील यांनी वापरली.

काही दिवसांपूर्वीच ठाकरे गटाच्या नेत्यांना प्रत्युत्तर देताना संजय दिना पाटील यांनी, 'माझ्या वाट्याला जाणाऱ्यांना मी एकतर हॉस्पिटलमध्ये पाठवेन नाहीतर स्मशानात पाठवेन. आमच्या घराण्यात आम्ही एकेकाळी पाच लोकांचे खून पाडलेत', अशी फुशारकी मारली होती. त्यावरुन ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पोलीस आयुक्तांना पत्र पाठवून दिना पाटील यांच्यावर कारवाईची मागणी केली होती. यावर प्रतिक्रिया विचारण्यासाठी गेलेल्या पत्रकारांना संजय दिना पाटील यांनी शिवीगाळ केली. यावेळी पत्रकारांनी त्यांना त्यांची मुलगी आणि ठाकरे गटाची नगरसेविका राजुल पाटील यांच्याविषयी प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला. परखड प्रश्न विचारणाऱ्यांना पत्रकारांसोबत संजय दिना पाटील यांनी गैरवर्तन केले. मी जे बोललोय ते खुलेआम बोललोय, माझ्यावर काय कारवाई करायची असेल तरी पोलीस करतील, मी कारवाई आणि चौकशीला तयार आहे, असे संजय दिना पाटील यांनी छाती ठोकून सांगितले. यावेळी संजय दिना पाटील हे प्रसारमाध्यमांवरही संतापले. तुम्ही माईक माझ्या तोंडासमोर कशाला धरता, आता तुम्ही तिकडे जाऊन आलात ना, मग इकडे येता, कशाला हे सगळं करताय, असे बोलताना संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना शिवीगाळ केली.

माझा शिवसैनिकांसोबत कोणताही वाद नाही, काँग्रेस आणि राष्ट्रवादीचेही माझ्यावर उपकार आहेत. त्यांच्यामुळे मी खासदार झालो. जे नेते माझ्याविरोधात बोलत आहे, ते स्वत:ची सुरक्षा सोडून इकडे काही करायला येणार आहेत का? हे काही करणार, तेव्हा आम्ही मार खाऊन घ्यायचा का? हे लोक स्वत:च्या दादा लोकांकडून फोन करतात, सेक्युरिटीसाठी, ती केस पण दाबून टाकली. ती केस काढायला सांगा ना. मी संजय **(पान ६ वर...)**

### खासदाराला कठोर शब्दात तंबी द्या –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

माध्यमांशी अर्वाच्य भाषेत बोलणाऱ्या खासदाराला कठोर शब्दात तंबी द्या, असं म्हणत फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नाराजी व्यक्त केली. सरकारची प्रतिमा मलिन करणाऱ्या गोष्टी खपवून घेतल्या जाणार नाहीत, असा इशारा संजय पाटील यांच्या वक्तव्यावरून मुख्यमंत्र्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिल्याची माहिती आहे.

# नांदेडकरांचे प्रेम विसरणार नाही –अबिनाश कुमार



**नांदेड (प्रतिनिधी)–** मागील अडीच ते तीन वर्षांपासून नांदेड जिल्ह्यातील केलेल्या कामाच्या अनुभवाचा फायदा मला पुणे येथे काम करताना निश्चीतपणे होईल, नांदेडकरांनी माझ्यावर मनापासून प्रेम केले, ते मी कदापी विसरणार नाही, अशी भावनात्मक प्रतिक्रिया मावळते पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी व्यक्त केली. ते पोलीस अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलत होते.

पुढे ते म्हणाले की, नांदेडमध्ये काम करणे खूप आव्हानात्मक होते. पूर्वीचा अपर पोलीस अधीक्षक म्हणून असलेला जनसंपर्क पोलीस अधीक्षक म्हणून काम करताना महत्त्वाचा ठरला. या जनसंपर्काच्या जोरावर मला चांगले काम करता आले.अनेक गुन्हेगारी टोळ्यांचा बंदोबस्त करण्यासोबतच शहरासह जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यात यश मिळाले असून गुन्हेगारीवर बऱ्यापैकी नियंत्रण आणता आल्याचे समाधान वाटते, असे ते यावेळी म्हणाले. विशेष म्हणजे येथील पत्रकारांनीही पोलीस विभागाला वेळोवेळी सहकार्य केल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला नाही. विशेष म्हणजे माझा कार्यकाळात कुठलीही जातीय दंगल झाली नाही. पोलिसांनीही तितकीच तत्परता दाखवत घडलेल्या घटनांना प्रतिसाद दिला त्यामुळे काही अनुचित प्रकार घडला नाही, असेही ते म्हणाले.

## शहीद जवानांच्या वारसांना शेतजमीन हस्तांतरणासाठी मुद्रांक शुल्क पूर्णपणे माफ

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील वीर जवान आणि अधिकारी शहीद झाल्यानंतर त्यांच्या वीर माता, वीर पत्नी किंवा अधिकृत वारसांना उदरनिर्वाहासाठी शासनाकडून शेतीसाठी जमीन दिली जाते. मात्र, ही जमीन त्यांच्या नावावर करताना मोठ्या प्रमाणावर मुद्रांक शुल्क भरावे लागत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हे मुद्रांक शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान भवन परिसरात माध्यमांशी संवाद साधताना दिली.

माध्यमांशी बोलताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शहीद कुटुंबांना दिलासा देण्यासाठी देवेंद्र फडणवीस सरकारने हा मोठा निर्णय घेतला असून, आता महसूल खात्याची जमीन वीर माता किंवा पत्नीच्या नावे करताना कोणतेही शुल्क भरावे लागणार नाही, असे ते म्हणाले.

# शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार –आ. रोहित पवार



**नांदेड (प्रतिनिधी)–** सरकारने पंढरपूर येथील पवित्र नगरीत कर्जमाफीची घोषणा केल्यानंतरही त्याची अंमलबजावणी कुठेच होताना दिसत नसल्याने या महाराष्ट्रातील शेतकरी देशोधडीला लागला आहे. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्रभर आंदोलन उभे केले. कुठल्याही परिस्थितीत सरकारला शेतकऱ्यांप्रती गुडघ्यावर आणल्याशिवाय स्वस्थ बसणार नसल्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत दिला.

शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी आणि तमाम मराठवाड्यातील शेतकऱ्यांशी संवाद साधत २९ जून रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या आंदोलनाला मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे यासाठी आमदार रोहित पवार गुरुवारी **(पान ३ वर...)**

# निकृष्ट दर्जाच्या सुपारीवर एफडीएची धडक कारवाई; ८६ लाखांचा साठा जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत नांदेड जिल्ह्यात निकृष्ट दर्जाची असल्याचा संशय असलेली सुपारी जप्त केली. या कारवाईत सुमारे २९ हजार ६७६ किलो सुपारीचा साठा जप्त करण्यात आला असून त्याची अंदाजे किंमत ८६ लाख ३६ हजार ५८६ रुपये इतकी आहे.


महाराष्ट्र राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार २२ जून रोजी सोलापूर-नागपूर महामार्गावरील पार्डी टोल नाका (ता. अर्धापूर, जि. नांदेड) येथे कारवाई करण्यात आली. (के.ए.२९- बी- ६८८०) या वाहनाची तपासणी केली असता त्यामधील सुपारीचा दर्जा संशयास्पद वाटल्याने दोन अन्न नमुने प्रयोगशाळा विश्लेषणासाठी घेण्यात आले. उर्वरित संपूर्ण साठा जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी शिल्पा श्रीरामे, अमृता दुधाटे, अरूण तम्मडवार आणि अ. नं. गिरी यांच्या पथकाने सहायक आयुक्त रा. मा. भरकड तसेच छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहआयुक्त (अन्न) श्रीकांत करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली.

दरम्यान, अन्न व औषध प्रशासनाने राज्यातील हॉटेल, उपहारगृह, खाद्यगृह आणि सर्व अन्न सेवा आस्थापनांसाठी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत जारी केलेल्या सर्वंकष अनुपालन आदेशांची कठोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

या पार्श्वभूमीवर २५ जून रोजी नांदेड येथील हॉटेल मिंट, छत्रपती चौक येथे बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत सहायक आयुक्त रा. मा. भरकड आणि सु. द. जिंतुरकर यांनी संबंधित आस्थापनांना नियमांचे तंतोतंत पालन करण्याचे आवाहन केले.

अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.




## अबिनाश कुमार यांना निरोप तर नवीन एसपी निलभ रोहन यांच्या स्वागताचा कार्यक्रम



**नांदेड (प्रतिनिधी)–** आयपीएस अधिकारी अबिनाश कुमार यांची नांदेड येथून जिल्हा पोलीस अधीक्षक पदावरून पुणे येथे पोलीस उपायुक्त या पदावर बदली झाली आहे. त्यानिमित्त त्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन शुक्रवार, दि. २६ जून रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे करण्यात आले आहे.

याचबरोबर नांदेड येथे नव्यानेच जिल्हा पोलीस अधीक्षक पदावर रूजू झालेले डॉ. निलभ रोहन यांचे स्वागतही यावेळी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास नांदेड शहर आणि जिल्ह्याच्या विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन या समारंभाचे मुख्य संयोजक श्याम पाटील वडजे यांनी केले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# मर मर... आठी म्हणजेच मराठी?

महाराष्ट्र हे मराठी भाषेचे माहेरघर. संतांची, साहित्यिकांची, विचारवंतांची आणि कलावंतांची भूमी. याच महाराष्ट्रात मराठी भाषेच्या सन्मानाची ग्वाही देत मराठी दिन साजरा केला जातो. मराठीचा अभिमान व्यक्त केला जातो. मात्र प्रत्यक्ष कृतीची वेळ आली की, मराठीची अवस्था एखाद्या अनाथ माऊलीसारखी झालेली दिसते. विधानसभेच्या सर्वोच्च आसनावर बसलेल्या अध्यक्षांकडूनच मराठी शब्दांचे अक्षरशः धिंडवडे निघाले आणि त्यानंतर आलेली दिलगिरी म्हणजे जखमेवर मलम नव्हे तर मीठ चोळण्याचा प्रकार ठरला. पद्मविभूषण आशा भोसले यांच्यावरील शोकप्रस्तावाचे वाचन करताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केलेल्या असंख्य उच्चार चुका राज्यभर चर्चेचा विषय ठरल्या. समाजमाध्यमांपासून ते राजकीय वर्तुळापर्यंत सर्वत्र नाराजी व्यक्त झाली. मराठी भाषेचा अभिमान बाळगणाऱ्या प्रत्येकाला हा प्रकार वेदनादायी वाटला. कारण ही चूक एखाद्या सामान्य व्यक्तीकडून नव्हे, तर राज्याच्या विधानसभेच्या अध्यक्षांकडून घडली होती. अमराठी माणसाकडून अशी चूक झाल्यास ती समजण्यासारखी आहे, परंतु नार्वेकरांकडून मात्र अशी अपेक्षा नाही. मूर्खपणा केल्यानंतर नार्वेकर यांनी दिलगिरी व्यक्त करताना चुकांचे खापर तांत्रिक त्रुटींवर फोडले. प्रत अस्पष्ट होती, फॉन्ट बारीक होता, मजकुरात चुका होत्या, म्हणून त्या वाचल्या गेल्या, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. हे ऐकल्यावर मराठी माऊलीलाच प्रश्न पडला असेल की, माझे भविष्य आता फॉन्टच्या आकारावर अवलंबून आहे काय? वास्तविक, विधानसभा अध्यक्षांचे पद हे केवळ औपचारिक नसते. त्या पदावर बसणाऱ्या व्यक्तीकडून भाषेचे, परंपरेचे आणि संसदीय संस्कृतीचे भान अपेक्षित असते. शोकप्रस्ताव हा एखादा साधासुधा दस्तऐवज नसतो. तो सभागृहाच्या भावना व्यक्त करणारा गंभीर दस्तऐवज असतो. अशा वेळी जर प्रत अस्पष्ट वाटत असेल, तर वाचनापूर्वी ती तपासण्याची जबाबदारी कोणाची? तांत्रिक त्रुटी हा शब्द आजकाल प्रत्येक चुकीचा अधिकृत बचाव बनला आहे. संगणक चुकला, फॉन्ट चुकला, प्रणाली चुकली; फक्त माणूस कधीच चुकत नाही! नार्वेकरांनी केवळ मराठी भाषेतील उच्चाराच्या अनेक चुका केल्या असे नव्हे तर त्यांनी दीनानाथ मंगेशकर यांचा उल्लेख चक्क दीनदयाल असा केला. विशेष म्हणजे महाराष्ट्रात मराठी भाषेच्या संरक्षणासाठी कायदे करण्याची चर्चा होते. दुकानांच्या पाट्या मराठीत असाव्यात यासाठी मोहिमा राबवल्या जातात. सरकारी कार्यालयांत मराठीचा वापर व्हावा यासाठी आदेश काढले जातात. पण त्याच महाराष्ट्राच्या विधानसभेत मराठीची अशी दुर्दशा होत असेल, तर सामान्य नागरिकांनी कोणाकडे पाहायचे? मराठीच्या सन्मानाचे धडे जनतेला देणाऱ्यांनी आधी स्वतःची परीक्षा द्यायला नको का? आज प्रश्न केवळ एका चुकीचा नाही. प्रश्न आहे भाषेबद्दलच्या संवेदनशीलतेचा. जर एखाद्या शोकप्रस्तावाचे वाचन करताना इतक्या चुका होऊ शकतात आणि त्यानंतर सर्व काही तांत्रिक कारणांवर ढकलले जाऊ शकते, तर उद्या कोणतीही जबाबदारी टाळण्यासाठी हा मार्ग खुला होईल. मग प्रशासनातील प्रत्येक त्रुटीचे कारण संगणक, फॉन्ट किंवा प्रिंटर यांनाच धरावे लागेल आणि त्यांनाच शिक्षा करावी लागेल? मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही; ती महाराष्ट्राच्या अस्मितेचा आत्मा आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, कुसुमाग्रज यांची परंपरा लाभलेल्या या भाषेचा मान राखणे हे प्रत्येक सार्वजनिक पदावरील व्यक्तीचे कर्तव्य आहे. त्यामुळे दिलगिरी व्यक्त करणे हा पहिला टप्पा असला, तरी तो पुरेसा नाही. अशा निष्काळजीपणाबद्दल जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. राज्य सरकार आणि संबंधित यंत्रणांनी या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी. विधानसभेच्या अध्यक्षपदासारख्या प्रतिष्ठित पदावरून झालेल्या या प्रकाराची चौकशी व्हावी आणि जबाबदारी निश्चित करून राहुल नार्वेकर यांची या पदावरून हकालपट्टी करण्यात यावी, अशी मागणी मराठीप्रेमींनी करणे स्वाभाविक आहे. कारण व्यक्तीपेक्षा संस्थेची प्रतिष्ठा आणि भाषेचा सन्मान मोठा असतो. अगोदरच मराठी शाळा बंद करून त्या ठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या शाळा चालवून आपलं चांगभलं करण्याची प्रवृत्ती असलेल्या नेत्यांच्या या महाराष्ट्रात माय मराठीची अवस्था आज अशी झाली आहे की, तिच्या नावाने राजकारण करणारे अनेक आहेत, पण तिचा खरा सन्मान जपणारे किती आहेत, हा प्रश्न उभा राहतो. मराठीच्या गौरवाची भाषणे आणि प्रत्यक्ष कृतीतील निष्काळजीपणा यातील दरी दिवसेंदिवस वाढत आहे. नार्वेकरांनी तर मराठीची अवस्था 'मर मर मर आठी' अशीच केली आहे. म्हणूनच मराठी माऊलीला आता आणखी दिलगिरी नव्हे, तर कृती हवी आहे. अन्यथा तांत्रिक त्रुटी या नावाखाली तिचा अपमान होत राहील आणि महाराष्ट्र तिच्याकडे अपराधी नजरेने पाहत राहील.

# मानवी हक्क संरक्षणार्थ राजर्षी शाहू महाराज यांचे योगदान



राजर्षी शाहू महाराज नव्या युगाचे सर्वांगीण राष्ट्रपुरुष होते. छत्रपती शाहू महाराजांच्या काळापूर्वी सामाजिक जीवनात जातीव्यवस्थेचे प्राबल्य होते आणि जातीभेदाच्या परंपरेमुळे भारतीय समाजात राजकीय आणि सामाजिक जीवनात अखंडता एकात्मता नव्हती. समाजात उच्च मानल्या गेलेल्या जातींनी परंपरेच्या आधारे व धार्मिक बंधनेद्वारे कनिष्ठ जातीवर अनेक बंधने लादली होती आणि अशा अमानवीय जातीव्यवस्थेमुळे समाजातील व्यक्तींना माणूस म्हणून असलेलेही अधिकार मिळत नव्हते. त्यामुळेच राष्ट्रीय व सामाजिक ऐक्य नष्ट करणारा जातिभेद दूर करून संपूर्ण भारतीय समाज एकत्र यावा, एकत्र व्हावा असा शाहू महाराजांचा विचार होता. जातीभेद हेच जाती मत्सराचे मूळ असल्याने सर्व जाती नष्ट करून समाज एकच एकजिनसी बनवण्याचे त्यांचे धोरण होते.

राजकीय सुधारणा आधी की, सामाजिक सुधारणा आधी याविषयी महाराजांपूर्वीच वाद निर्माण झाला होता, परंतु शाहू महाराजांच्या मते, हा वाद मुळातच चुकीचा आहे, कारण दोन्ही सुधारणा एकच असून समाज जीवनाच्या रथाची दोन चाके आहेत. त्याचबरोबर शाहू महाराजांच्या मते ब्रिटिशांच्या वर्चस्व विरुद्ध यशस्वी स्वातंत्र्य चळवळ करण्यासाठी सर्व जातींना विश्वासात घेणे आवश्यक आहे. संस्थानात सर्व लोकांना नागरिक म्हणून समान पातळीवरचे हक्क मिळावे असा त्यांचा अट्टाहास असे. ग्रीक तत्त्ववेत्ते ॲरिस्टॉटल म्हणतात की, राजा हा तत्ववेत्ता असला पाहिजे आणि राजर्षी शाहू महाराज खऱ्या अर्थाने तत्त्ववेत्ते राजे होते.

तत्कालीन राज्यांची बांधीलकी भोगविलास, कुटुंब विकास आणि केवळ मांडलिकत्व यापुरती मर्यादित होती. परंतु शाहू राजांची बांधिलकीही गरीब, अज्ञानी दुबळ्या, अस्पृश्यांशी होती, जातिभेद प्रश्न, वर्णव्यवस्था यावर कडाडून विरोध त्यांनी केला. समानतेचे तत्व, सामाजिक नीतिमत्ता, विधवा विवाह, पडदा पद्धत, दबलेले समाजघटक इत्यादींच्या हक्कासाठी लढा देऊन कृती कार्यक्रम आपल्या संस्थानात राबवण्याचे काम राजर्षी शाहू महाराजांनी केले. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग हा रंजल्या-गांजल्यासाठी केला म्हणूनच पुढील तुकाराम महाराजांच्या ओळी शाहू महाराज यांच्या कार्यातून स्पष्ट होतात,

जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।
तोचि साधू ओळखावा। देव तेथेचि जाणावा।

राजश्री शाहू महाराजांना सामाजिक न्यायाचे जनक मानावे लागेल. कारण ज्यावेळेस शाहू महाराजांच्या हाती सत्ता आली त्यावेळेस त्यांनी सर्वप्रथम कोल्हापूर संस्थानाच्या प्रजेच्या स्थितीची पाहणी केली आणि अनेक वर्ष खितपत पडलेल्या समाजाला विकासाच्या दिशेने नेण्याचे काम त्यांनी केले जो समाज अनेक वर्ष ज्ञान, शिक्षण, सत्ता, संपत्ती अशा अनेक गोष्टींपासून वंचित होता अशा समाजाला त्यांचे हक्क मिळावे यासाठी शाहू महाराज यांनी आग्रह धरला आणि त्यादृष्टीने पावलेही उचलली. अस्पृश्य, गरीब, शेतकरी, मजूर इत्यादी घटकांचे मोठ्या प्रमाणात शोषण होत होते अशा सामान्य जनतेच्या हक्क संरक्षण शाहू महाराजांनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत काम केले.

शाहू महाराजांनी तत्कालीन समाजव्यवस्थेत धर्माधिष्ठित जाती संस्थेच्या प्रभावाखाली असलेल्या नेत्यांनी मानवी हक्काचे जतन करण्याचा दृष्टीकोण स्वीकारावा असे मत व्यक्त केले आहे. शाहू महाराजांनी जाती व्यवस्थेविरुद्ध खंबीरपणे उभे राहण्याचे ठरवले. जातीभेदाची कालबाह्य व समाजविघातकता उच्चवर्णीय लोकांना युक्तिवादाने पटवून देऊन त्यांचे मतपरिवर्तन करण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. शाहू महाराजांनी महात्मा फुले यांचा संघर्ष वाद, न्यायमूर्ती रानडे यांची परंपरा निष्ठा, समन्वयशीलता, वास्तवाभिमुख दृष्टी यांची सांगड घालून महाराष्ट्रात पुरोगामी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. लोककल्याणकारी राज्याची संकल्पना खऱ्या अर्थाने छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अस्तित्वात आणली. लोक सुखी-समाधानी व्हावे यासाठी त्यांनी आपले राज्य चालवले. ते लोकांशी बांधील असणारे राजे होते. त्यांनी सामाजिक लोकशाहीची पायाभरणी आपल्या संस्थानात केली. ज्यांच्या राज्यकारभारात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, व्यक्ती प्रतिष्ठा, सहिष्णुता, लोकशाही ही मूल्य होती. एका अर्थाने राजेशाहीच्या आवरणात लोकशाही त्यांनी चालवली.

भारतातील सामाजिक कायद्याचे ते जनक होते. त्यांनी मर्यादित राज्यसंस्था ठेवून जबाबदारीने तत्व स्वीकारले त्यासाठी त्यांनी लोककल्याणाचे कायदे संमत करून कायद्यापुढे समानता व सर्वांसाठी समान कायदा या तत्त्वांचा स्वीकार केला आणि या तत्त्वांचा स्वीकार करत असताना ५० टक्के आरक्षण आपल्या संस्थानात लागू केले. याचा परिणाम आधुनिक भारताच्या लोकशाही व राज्यघटनेवर पडल्याचा दिसून येतो, म्हणूनच लोकशाही तत्वाचे जनक म्हणून भारताच्या इतिहासात राजर्षी शाहू महाराजांचा उल्लेख सुवर्ण अक्षरांनी झालेला आढळतो.

वेदोक्त प्रकरणातील अनुभवावरून या जाळ्यातून मुक्त झाल्याशिवाय उच्चवर्णीयांची धार्मिक मक्तेदारी नष्ट होणार नाही अशी शाहू महाराजांची धारणा होती. यामुळे ते महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारसरणीकडे आकर्षित झाले असले तरी ते शाहू महाराजांनी त्यांचे अनुयायित्व स्वीकारले नाही, परंतु त्यांचा सत्यशोधक तत्त्वांना त्यांचा मोठा पाठिंबा होता. बहुजन समाजात शिक्षण प्रसार करण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले. कोल्हापूर संस्थानातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत दिले. स्त्री शिक्षणासाठी नेहमी ते आग्रही होते. जातिभेद आणि अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाहाला मान्यता दिली.

१९२० सली त्यांनी वेठबिगारी पद्धत बंद केली आणि समाजाला गुलामगिरीतून मुक्त केले. त्याचबरोबर स्त्रियांच्या संदर्भात असलेली वाघ्या-मुरळी ही वाईट प्रथा, अमानवीय प्रथा बंद करण्यासाठी वाघ्या मुरळी प्रतिबंधात्मक कायदा त्यांनी पास करून ती प्रथा बंद केली आणि स्त्री सक्षमीकरणाला एक वाट करून दिली. बाल हक्क संरक्षणार्थही शाहू महाराजांनी खूप महत्त्वपूर्ण भूमिका वठवली दिसून येते. छत्रपती शाहू महाराजांनी सर्व मुलांच्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरला. केवळ आग्रह धरला असा नाही तर आपल्या संस्थानात शिक्षणाच्या सुविधा बालकांच्या विकासासाठी उपलब्ध करून देऊन देशाच्या भविष्य जडणघडणीची महत्त्वपूर्ण भूमिका त्यांनी पार पाडली आहे.

हिरे, माणिक, सोने उधळून जय जय कार करा ।
जय राजर्षी शाहू राजा, तुजला हा मुजरा ।
महाराष्ट्राचा उद्धारक तू रयतेचा राजा ।
पददलितांचा कैवारी तू, श्रमिकांचा राजा ।
पराक्रमी तू दैवत बहुजनांचे।
स्वातंत्र्याचे तूच मनोहर स्वप्न भारताचे ।

-डॉ. सत्यभामा जाधव
सदस्या-महिला व बाल कल्याण समिती, नांदेड
मो. ९४०३७४४७१५

# शिक्षणाला निधीचा श्वास कधी मिळणार?

शिक्षणावरील खर्च हा कोणत्याही राष्ट्राच्या भविष्याचा पाया असतो. देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि तांत्रिक प्रगतीचा वेग शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. त्यामुळेच राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० मध्ये शिक्षणावरील खर्च सकल देशांतर्गत उत्पादनाच्या किमान सहा टक्क्यांपर्यंत नेण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. मात्र, संसदीय स्थायी समितीच्या ताज्या अहवालाने हे उद्दिष्ट अद्याप दूर असल्याचे स्पष्ट केले आहे. ही बाब केवळ आकडेवारीपुरती मर्यादित नसून देशाच्या विकासाच्या दिशेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

सध्या भारतात शिक्षणावर होणारा एकूण खर्च जीडीपीच्या केवळ ४.१२ टक्के इतका आहे. जगातील सर्वाधिक युवा लोकसंख्या असलेल्या देशासाठी हा आकडा समाधानकारक म्हणता येणार नाही. विशेषतः भूटान आणि मालदीवसारखे तुलनेने लहान देशही शिक्षणावर भारतापेक्षा अधिक खर्च करीत असतील, तर त्याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. शिक्षण क्षेत्रात गुंतवणूक हा खर्च नसून तो भविष्यातील विकासाचा पाया असतो, हे शासनाने लक्षात घेणे आवश्यक आहे.




राष्ट्रीय शिक्षण धोरणाने २०३५ पर्यंत उच्च शिक्षणातील सकल प्रवेशदर ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी नवीन विद्यापीठे, संशोधन केंद्रे, डिजिटल पायाभूत सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सहाय्य यांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. परंतु निधीची कमतरता असल्यास ही उद्दिष्टे केवळ कागदावरच राहण्याची शक्यता आहे. उच्च शिक्षण विभागाच्या अर्थसंकल्पात महागाईच्या तुलनेत पुरेशी वाढ न झाल्याची समितीची चिंता त्यामुळे रास्त वाटते.

शिक्षण क्षेत्रातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे गुणवत्तेतील विषमता. शहरांतील आणि ग्रामीण भागातील शिक्षणाच्या संधींमध्ये मोठी तफावत आहे. अनेक शाळांमध्ये मूलभूत सुविधा, प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव आहे. उच्च शिक्षणातही संशोधनासाठी आवश्यक निधी आणि आधुनिक सुविधा अपुऱ्या आहेत. अशा परिस्थितीत जागतिक दर्जाचे शिक्षण देण्याची अपेक्षा करणे वास्तववादी ठरणार नाही.

सरकारने वित्त मंत्रालयाच्या मर्यादांचा दाखला देत आपली भूमिका स्पष्ट केली असली, तरी शिक्षणाला खर्चाच्या यादीतील एक विभाग म्हणून पाहण्याऐवजी विकासाच्या केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. रस्ते, उद्योग आणि पायाभूत सुविधांइतकेच शिक्षणालाही प्राधान्य मिळाले पाहिजे. कारण सुशिक्षित आणि कौशल्यसंपन्न मानवसंपदा हीच कोणत्याही अर्थव्यवस्थेची खरी ताकद असते. आज भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याची आकांक्षा बाळगतो. परंतु आर्थिक महासत्ता बनण्याचा मार्ग शिक्षणाच्या वर्गखोल्यांतूनच जातो. शिक्षणावरील खर्च वाढविण्याचा प्रश्न हा केवळ बजेटचा विषय नाही; तो देशाच्या भवितव्याचा प्रश्न आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाची उद्दिष्टे साध्य करायची असतील, तर शिक्षण क्षेत्रासाठी अधिक उदार आर्थिक तरतूद करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा ज्ञानाधिष्ठित भारत हे स्वप्न घोषणांपुरतेच मर्यादित राहण्याचा धोका आहे.

-मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# भारतमातेचे थोर सुपुत्र-चापेकर बंधू!

राष्ट्रकार्यासाठी तीन सख्या बंधूंनी बलिदान देण्याचे जगातील एकमेव उदाहरण म्हणजे चापेकर बंधू, त्यापैकी थोरले दामोदर हरि चापेकर यांची जयंती नुकतीच २५ जूनला पार पडली. चापेकरांचे घराणे मूळचे कोकणातील वेळणेश्वरचे; मात्र त्यांचे पूर्वज पुण्याजवळील चिंचवडला येऊन स्थायिक झाले. तेथेच २५ जून १८६९ या दिवशी दामोदरपंतांचा जन्म झाला. लहानपणापासूनच दामोदरपंत आणि त्यांचे दोन्ही बंधू बाळकृष्ण आणि वासुदेव यांचा ओढा हिंदुस्थानला परदास्यातून मुक्त करण्याकडे होता. क्रांतीकार्याची आवश्यकता म्हणून ते प्रतिदिन बाराशे सूर्यनमस्कार घालीत, तसेच एका तासात अकरा मैल पळण्याचाही वेग त्यांनी प्राप्त केला होता. दामोदर यांच्यावर लहानपणापासूनच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या विचारांचा आणि देशप्रेमाचा मोठा प्रभाव होता. ते राष्ट्रभक्ती आणि व्यायामाचे भोक्ते होते.

दामोदरपंतांचे वडील हरिभाऊ हे कीर्तनकार आणि प्रवचनकार होते. प्रत्येक चातुर्मासात मुंबईला जाऊन प्रवचने करण्याचा त्यांचा प्रघात होता. १८९६ च्या चातुर्मासात वडिलांबरोबर साथीला गेलेल्या दामोदर आणि बाळकृष्ण यांनी तेथील राणी व्हिक्टोरियाच्या पुतळ्याला डांबर फासून जोड्यांची माळ घातली. या काळात काँग्रेसच्या अधिवेशनांचा प्रारंभ ब्रिटिशांच्या राणीच्या स्तवनाने होत असे, हे माहीत असलेल्यांना या धाडसी कृत्याचे मोल कळेल!

१८९६ साली ग्रंथिक सन्नीपात (प्लेग) हा रोग पुण्यात झपाट्याने पसरू लागला. सरकारने या साथीचा बंदोबस्त करण्यासाठी 'रँड' नावाच्या आय.सी.एस. अधिकाऱ्याची नेमणूक केली. त्याचे गोरे सैनिक घरे तपासण्याच्या निमित्ताने नागरिकांवर अत्याचार करू लागले. घरातील देवघराची विटंबना करू लागले. पुण्यातील हे अत्याचार चापेकर बंधूंच्या अंत:करणात प्रतीशोधाची आग पेटवत गेले. रँडचा सूड घेण्याची संधी चापेकरबंधूंना लवकरच मिळाली. १८९७ हे वर्ष राणी व्हिक्टोरियाच्या राज्यकारभाराचे ६० वे वर्ष होते. त्या निमित्ताने पुण्यातही गणेश खिंडीतील राजभवनावर एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. २२ जून १८९७ या रात्री गणेश खिंडीतील समारंभ आटोपल्यावर रँड आणि लेफ्टनंट आयर्स्ट आपापल्या स्वतंत्र घोडागाड्यांतून निघाले. आयर्स्टची घोडागाडी पुढे होती. वासुदेवरावांची 'गोंद्या आलाऽ रे आला' ही परवलीची आरोळी ऐकताच आणि रँडसारखी दिसणारी आयर्स्टची घोडागाडी दिसताच बाळकृष्ण चालत्या घोडागाडीत शिरले आणि त्यांनी त्यांचे 'रिव्हॉल्व्हर' आयर्स्टच्या मस्तकात रिकामे केले. तरी-ही लांबून येणारी परवलीची आरोळी थांबत नाही, हे कळताच दामोदरपंत काय ते समजले.



बाळकृष्णपंतांनी हिरावून घेतलेली संधी परत मिळाल्याचा आनंदही त्यांना झाला. रँडच्या गाडीमागे धावणाऱ्या वासुदेवरावांना थांबवून त्यांनी स्वत: गाडीवर उडी घेतली. छपरावरील पडदा बाजूला सारून त्यांनी पाठमोर्या रँडवर आपले रिव्हॉल्व्हर मोकळे केले. दामोदरपंत कार्यसिद्धीच्या आनंदात गाडीवरून खाली उतरले; पण दोन्ही घटना गाडीहाक्यांच्या ध्यानातच आल्या नाहीत. काही महिन्यांनी द्रविड बंधूंच्या चुगलखोरीमुळे दामोदरपंत आणि बाळकृष्णपंत यांना पकडण्यात आले. त्यांच्यावर अभियोग चालून १८.४.१८९८ या दिवशी दामोदरपंतांना पुण्याच्या येरवडा कारागृहात फाशी देण्यात आली. फाशीच्या पाळण्यावर जाताना त्यांच्या हातात लोकमान्य टिळकांनी दिलेली 'श्रीमद्भगवद्गीता' होती. २.५.१८९९ या दिवशी बाळकृष्णपंतांनाही फाशी देण्यात आले. चापेकर बंधूंची ही कहाणी एवढ्यावरच संपली नाही.

द्रविड बंधूंच्या चुगलखोरीची माहिती कळताच धाकटे वासुदेवपंत संतप्त झाले. महादेव रानडे नावाच्या मित्राच्या साहाय्याने त्यांनी चुगल-खोर द्रविडबंधूंना ठार मारले आणि ८ मे १८९९ या दिवशी ते स्वत: फासावर चढले रँडच्या वधाच्या वेळी दामोदरपंतांचे वय होते २७ वर्षे, मधल्या बाळकृष्णपंतांचे वय होते २४ वर्षे आणि धाकट्या वासुदेवरावांचे वय होते १८ वर्षे! या विशी-पंचवीशीतील तरुणांचा असीम त्याग आणि शौर्य पाहून आजही उर अभिमानाने भरून येतो! तीन सख्या भावांनी राष्ट्रकार्यासाठी केलेले हे बलीदान जगात एकमेव आहे! चापेकर बंधूंचे हे सर्वोच्च बलिदान भारतीय स्वातंत्र्यलढ्यात मैलाचा दगड ठरले. त्यांच्या या अदम्य साहसाने पुढे स्वातंत्र्यवीर सावरकर आणि अनंत कान्हेरे यांच्यासारख्या शेकडो तरुणांना सशस्त्र क्रांतीची प्रेरणा दिली.

-जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

# लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज!

आज २६ जून, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती. आजच्याच दिवशी १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर (करवीर) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते.

छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले.



शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थनचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते.

अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दुष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले.

छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. बाबासाहेब मॅट्रिक-मध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. जयंतीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

-श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# रोटेगाव येथे टॉवर कार सायडिंग व शेडचे लोकार्पण; नांदेड विभागाच्या ओएचई देखभाल व्यवस्थेला मिळाले बळ

**नांदेड (प्रतिनिधी)** – दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील नव्याने स्थापन झालेल्या ट्रॅक्शन डिस्ट्रीब्युशन विभागाच्या ओव्हरहेड इक्विपमेंट देखभाल व्यवस्थेला अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलत, रोटेगाव यार्ड येथे समर्पित टॉवर कार सायडिंग व टॉवर कार शेड कार्यान्वित करण्यात आले आहे.



नांदेड विभागातील टीआरडी विभागाला नुकत्याच सुमारे सहा टॉवर कार उपलब्ध झाल्या आहेत. या टॉवर कारच्या माध्यमातून दैनंदिन देखभाल, नियमित तपासणी, बिघाडांच्या वेळी तातडीची दुरुस्ती तसेच आपत्कालीन पुनर्स्थापना कार्य प्रभावीपणे करता येणार आहे. या वाहनांचा अधिकाधिक कार्यक्षम वापर सुनिश्चित करण्यासाठी देखभाल कर्मचाऱ्यांची उपलब्धता असलेल्या डेपोच्या होमिंग यार्डमध्ये स्वतंत्र स्टेबलिंग सुविधा आवश्यक होती.

रोटेगाव येथे उभारण्यात आलेल्या या समर्पित टॉवर कार सायडिंग व शेडमुळे टॉवर कार सुरक्षितपणे उभ्या ठेवता येणार असून, बिघाड, देखभाल, तपासणी तसेच आपत्कालीन परिस्थितीत त्या त्वरित घटनास्थळी रवाना करता येतील. त्यामुळे यंत्रणेची विश्वासार्हता, उपलब्धता आणि देखभाल कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होणार आहे.

अंकाई-मुदखेड मुख्य रेल्वेमार्गावर उभारण्यात आलेले हे पहिले टॉवर कार सायडिंग व शेड असून, नांदेड विभागाच्या OHE देखभाल पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणातील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. या सुविधेमुळे OHE बिघाडांवरील प्रतिसादाचा वेळ कमी होईल, सेवा पूर्ववत करण्यास लागणारा कालावधी घटेल, देखभाल अधिक परिणामकारक होईल आणि रेल्वे वाहतुकीची सुरक्षितता व विश्वासार्हता आणखी वाढेल.

भारतीय रेल्वेच्या सुरक्षित, कार्यक्षम आणि विश्वासार्ह रेल्वे सेवा प्रदान करण्याच्या वचनबद्धतेला ही सुविधा अधिक बळकटी देणारी ठरणार आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सार्वजनिक वाचनालयात आज राजर्षी शाहू महाराज जयंती कार्यक्रम

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – पुण्यश्लोक अहिल्यादेवी सार्वजनिक वाचनालय होळकर नगर सिडको नांदेड येथे २६ जून रोजी सकाळी ९ वाजता राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त वाचकांसाठी महापुरुष वाचल तर वाचाल या विषयावर वाचक मेळावा व वृक्षारोपणाचा कार्यक्रम प्रा. शिवाजी इंदूरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला आहे.

याप्रसंगी प्रमुख वक्ते डॉ. शंकर स्वामी वडेपुरीकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तसेच यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. गणपत जिरोनेकर, डॉ.निलेश झुंबड, धोंडीबा मोरे, नारायण अंभुरे, संजय घोगरे, गंगाप्रसाद काकडे, वैजनाथ देशमुख, मंगला देशमुख, सतीश बसवदे आदी उपस्थित राहणार आहेत.

राजर्षी शाहू महाराज जयंती सोहळ्याला सिडको भागातील नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी सार्वजनिक वाचनालय कर्मचारी व समाज संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जिल्हास्तरीय जयंती उत्सवाच्या पूर्वतयारीची आज बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)** – सामाजिक समता, श्रमिकांचे हक्क आणि लोकसाहित्याची समृद्ध परंपरा जपणारे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जिल्हास्तरीय सार्वजनिक जयंती उत्सवाच्या नियोजनासाठी महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन शुक्रवार, दि. २६ जून २०२६ रोजी दुपारी ४ वाजता शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे करण्यात आले आहे.



या बैठकीत यंदाच्या जयंती उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हास्तरीय सार्वजनिक जयंती मंडळाची स्थापना करण्यात येणार असून, उत्सव अधिक व्यापक, भव्य आणि संघटित स्वरूपात साजरा करण्याबाबत चर्चा करण्यात येणार आहे.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जपत जिल्हास्तरीय जयंती उत्सव ऐतिहासिक पद्धतीने साजरा करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे सकल मातंग समाज, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, युवक, महिला तसेच समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपले मोलाचे योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या बैठकीला समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सकल मातंग समाज समन्वयक तथा जिल्हा जयंती मंडळाचे संयोजक ॲड. गणेश तादलापूरकर यांनी केले आहे. संयोजन समितीचे सल्लागार सदस्य ॲड सुरेंद्र घोडजकर, माजी जिल्हा परिषद सदस्य आनंदा गुंडले, सेवानिवृत्त सनदी अधिकारी व्ही. जे. वरवंटकर, सेवानिवृत उपअभियंता इंजि. सुग्रीव अंधारे, बाबुराव पवित्रे, माजी नगरसेवक प्रकाश मुराळकर, माजी नगरसेवक उमेश पवळे, मेजर जनार्धन गुपिले, माजी नगरसेवक आनंद जाधव, प्रा. देविदास इंगळे, शिवा कांबळे, संजय मोरे, लालबाजी घाटे, ॲड. प्रसाद रानवळकर, नागेश तादलापूरकर, भालचंद्र पवळे, एन. जी. पोतरे, विजय रणखांब, मारोती चिवळीकर, किरण गोईनवाड, परमेश्वर बंडेवार, कॉ. अंबादास भंडारे, किशोर वागदरीकर, निलेश तादलापूरकर, नितीन सरोदे, यशपाल गवाले, नामदेव कांबळे, रोहन वाघमारे, प्रा. अमर आईलवार, बाळू लोंढे, माधव डोमपल्ले, दयानंद बसवंते, बालाजी करंडकर, गणेश मोरे, प्रेमानंद शिंदे, नागोराव आंबटवार, इरवंत सूर्यकार, राहुल तेलंग, बाळू खोबरे, गणेश वाघमारे (सांगवी), संजय गायकवाड, सचिन वाघमारे, ज्ञानेश्वर डोम्पले, डी. एन. मोरे, डी. जी. सूर्यवंशी, निवृत्ती गायकवाड, बालाजी वाघमारे, अविनाश आंबटवार, अंकुश गायकवाड, उत्तम गायकवाड, अरुण मोरे, सुनीलकुमार मोघेकर, माधव गोरकवाड, स्वप्नील फुले, शशिकांत तादलापूरकर, सुरेश आंबटवार, माधव वाघमारे (बळीरामपूर), संजय गोटमुखे, संतोष शिंदे, सुनील जाधव, अविनाश खडसे, सोनू वाघमारे, प्रथमेश तादलापूरकर, शिवाजी होकळे, अमित जाधव, प्रकाश संपत्ते, पिंटू गज्जलवाड, गणेश दाडे, आकाश गवाले यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# शिवाजीराजे पाटील यांचा नीट-जेईई-सीईटी ओरिएंटेशन प्रोग्राम संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** – व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या नीट, जेईई, सिईटी या स्पर्धा परीक्षेच्या फाऊंडेशनची तयारी करणाऱ्या आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी शिवाजीराजे पाटील यांचा ओरिएंटेशन प्रोग्राम हर्षोल्लासात संपन्न झाला.




यावेळी सुप्रसिद्ध करिअर मार्गदर्शक तथा मोटिव्हेशनल स्पिकर इंजि. शिवाजीराजे पाटील, रेडिएंट करिअर अकॅडमीचे संचालक प्रा. एस. एस. समीम, प्रा. सिद्दी फरहान, प्रा. सलीम देशमुख, प्रा सिद्दी सिकंदर देसाई, विष्णुकांत पाटील, प्राचार्य रफिक अहमद, डॉ. इजहार देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. फईम देसाई, सूत्रसंचालन प्रा. सीमा व प्रा अलका व आभार प्रदर्शन प्रा. इकराम देसाई यांनी केले.

याप्रसंगी देशमुख कोचिंग इन्स्टिट्यूटच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थीहितेषी उपक्रमांची माहिती देण्यात आली. इन्स्टिट्यूटच्या वतीने घेण्यात आलेल्या स्कॉलरशिप परीक्षेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

## सामाजिक न्याय दिनानिमित्त नांदेड येथे आज समता दिंडीचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म दिन २६ जून हा दिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा करण्याबाबत शासनाचे निर्देश प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सहायक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड कार्यालयामार्फत सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात येत आहे.

या निमित्ताने नांदेड जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थी, शालेय विद्यार्थी तसेच नागरिकांसाठी दि. २६ जून २०२६ रोजी सकाळी ८ वाजता राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त समता दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे.

समता दिंडीची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात येईल. दिंडीचा मार्ग महात्मा ज्योतिबा फुले पुतळा, स्नेहनगर ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुतळा असा राहणार असून, राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुतळा येथे दिंडीचा समारोप होईल. या समता दिंडीत नांदेड जिल्ह्यातील महाविद्यालये, शाळांतील विद्यार्थी तसेच नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन समाज कल्याण नांदेडचे सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

# महिलांच्या उत्स्फूर्त सहभागाने मांडवा येथे आरोग्यदायी रेसिपी स्पर्धा

**किनवट (प्रतिनिधी)** – भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्यावतीने 'संकल्प से समृद्धी' अभियानांतर्गत मांडवा येथे आयोजित करण्यात आलेल्या 'नो कुकिंग, नो ऑईल, नो गॅस' रेसिपी स्पर्धेला महिलांचा प्रतिसाद लाभला.




कडधान्ये व नैसर्गिक घटकांपासून तयार केलेल्या पौष्टिक पदार्थांच्या माध्यमातून आरोग्यदायी आहाराचा संदेश देतानाच महिला सक्षमीकरणालाही या उपक्रमातून चालना देण्यात आली. भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा मंगाराणी अंबुलगेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून प्रदेश कार्यकारिणीच्या सदस्या संध्या राठोड उपस्थित होत्या. आहारतज्ज्ञ डॉ. वंदना पत्की यांनी संतुलित आहार, कडधान्यांचे पोषणमूल्य आणि निरोगी जीवनशैलीबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास तालुकाध्यक्ष सुकेशनी कपाटे, शहराध्यक्षा पुनम दीक्षित, सरपंच सुनीता आत्राम, उपसरपंच रवीकांत वझलवार, कृष्णकमल नडकुंटीवार, ग्रामपंचायत सदस्या संटीबाई नडकुंटीवार, अंगणवाडी सेविका सुनीता मुंडे, सुनीता आडे, आरोग्य सेविका वंदना मेश्राम, सीमा काळे आदी उपस्थित होते.

स्पर्धेत सोनाली बासेट्टीवार, गायत्री अजय शिंदे पाटील, सपना साळवे पाटील, किरण साळवे पाटील, सुनीता मुंडे, लक्ष्मीबाई ताडकुळे, रजिता सटलावार, अश्विनी अन्नमवार, सपना चुकलवार, रेखा बासेट्टीवार, सोना सटलावार, प्राची शेटपेलीवार, निशा शेरलावार आदींसह अनेक महिलांनी सहभाग नोंदविला. उत्कृष्ट पदार्थांची निवड करून विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली, तर सर्व सहभागी महिलांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

प्रदेश भाजप महिला मोर्चा अध्यक्षा चित्रा वाघ, माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, आ. भीमराव केराम, आ. श्रीजया चव्हाण, भाजप जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख आणि जिल्हा प्रभारी उत्तरा कलबुर्गे यांच्या प्रेरणेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला. सूत्रसंचालन सागर शिंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सागर शिंदे पाटील व सुजाता तोटावार यांनी प्रयत्न केले.

## बालाजी मंदिरात जागतिक योग दिन साजरा



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – सिडको योग विद्याधामच्यावतीने आंतरराष्ट्रीय योग दिन बालाजी मंदिर सिडको येथे उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध योगासने, प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लेखिका सिंधुताई तिडके, आकाशवाणी केंद्राच्या निवेदिका राजश्री मिरजकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले मान्यवरांचा सत्कार बालाजी मंदिर विश्वस्त समितीचे अध्यक्ष साहेबराव जाधव व योगशिक्षक गिरधर मैड यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुण्यांनी योगाचे आरोग्यासाठी असलेले महत्त्व विशद केले. यावेळी योग शिक्षक के. एम. पटणे, सौ. हाडोळे, विद्या शिंदे, डॉ. जीरोनकर, शरद दहीवाल, शिवानंद कदम, मंगलाताई यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक, पालक व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. यावेळी योग गीत संजय देशपांडे यांनी सादर केले.

# ३० जून ते २९ जुलै मतदार यादी विशेष पुनर्निरीक्षण

### प्रत्येक मतदारांनी गणना फॉर्म (ईएफ) भरून देणे अनिवार्य –तहसीलदार विठ्ठल परळीकर

**लोहा (प्रतिनिधी)** – भारत निवडणूक आयोगामार्फत मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनर्निरीक्षण (एसआयआर) कार्यक्रम लोहा तालुक्यात ३० जून ते २९ जुलै या काळात राबविण्यात येत आहे. त्यासाठी प्रत्येकाच्या घरी बीएलओ येणार आहेत. ते गणना फॉर्म (ईएफ) देतील तो सर्व मतदारांनी भरून देणे अनिवार्य आहे. फॉर्म भरून देणार नाहीत त्याची नावे मतदार यादीतून वगळली जातील. तेव्हा नागरिकांनी मतदार यादी पुनर्निरीक्षण मोहिमेसाठी सहकार्य करावे, असे आवाहन सहायक मतदार नोंदणी अधिकारी व तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी केले आहे

भारत सरकार निवडणूक आयोगाने मतदार यादी पुनर्निरीक्षण (एसआयआर) कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे याबाबत तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी सांगितले की, लोहा तालुक्यात ३० जून ते २९ जुलै २०२६ पर्यंत मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट देणार आहेत. त्यावेळी प्रत्येक मतदारासाठीचा गणना अर्ज देतील तेव्हा तो मतदारांनी भरून देणे अनिर्वाय आहे. गणना अर्ज काळजीपूर्वक हाताळून भरून बीएलओ यांचेकडे द्यावा. गणना अर्ज बीएलओ यांचेकडे परत करण्याची जबाबदारी ही संबंधित मतदारांची राहील.



गणना अर्ज भरून नजीकच्या काळातील पासपोर्ट साईजचा कलर फोटो व पुरावे सोबत देऊन बीएलओकडे जमा करावेत. जे मतदार गणना अर्ज भरून देणार नाहीत अशा मतदारांची नावे मतदार यादीमधून वगळली जातील याची नोंद घ्यावी.

मतदार याद्याचा विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रमात सर्व मतदारांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन विठ्ठल परळीकर सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार लोहा यांनी केले आहे. एसआयआरसाठी तहसीलदार परळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार अशोक मोकले, निवडणूक नायब तहसीलदार डॉ. संदीप हाडगे, निवडणूक विभाग प्रमुख राजेश गायंगी, महसूल सहायक बालाजी उटलवाड, ईश्वर धुळगंडे, सूर्यकांत पांचाळ, महेंद्र कांबळे व टीम परिश्रम घेत आहे.

**मतदारांनी द्यायचे पुरावे**

२००२ पूर्वीची मतदार यादी किंवा जुनी निवडणूक पावती, जमीन /मालमत्तेची कागदपत्रे किंवा भाडेकरू असल्याच्या नोंदी, नागरिकत्व प्रमाणपत्र, कायमस्वरूपी रहिवासी प्रमाणपत्र नोंदणी प्रमाणपत्र, पासपोर्ट, एलआयसी पॉलिसीची कागदपत्रे, शासनाने दिलेला कोणताही अधिकृत परवाना/प्रमाणपत्र, शासकीय किंवा निमशासकीय नोकरीचे प्रमाणपत्र/दस्तऐवज, बँक किंवा शासकीय ओळखपत्र. पोस्ट ऑफिसचे खाते/ पासबुक, जन्म प्रमाणपत्र, बोर्ड किंवा विद्यापीठाचे शैक्षणिक प्रमाणपत्र, न्यायालयाच्या नोंदी किंवा कायदेशीर कागदपत्रे, रेशन कार्ड आदी पुरावे द्यावे लागणार आहेत.

## सिडको येथे आज पीपल्स फोर्सचा शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार वितरण सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)** – छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवार, दि. २६ जून रोजी दुपारी १२ वाजता नवीन नांदेड सिडको येथील कामगार कल्याण केंद्राच्या सभागृहामध्ये अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सच्यावतीने छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते सायलूदादा म्हैसेकर हे या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष असून, ज्येष्ठ नेते सय्यद मुजीम भाई यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. अण्णाभाऊ साठे पीपल्सचे संस्थापक बा. रा. वाघमारे हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार असून ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. जे. टी. जाधव आणि मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार हे प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत.

यावेळी भंते पंय्याबोधी, वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. घुंगरवार, प्रा. डॉ. सुनीलचंद्र सोनकांबळे, अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सचे प्रदेशाध्यक्ष डी. एस. वाघमारे, लॉर्ड बुद्ध टीव्ही चॅनलचे अँकर प्रा. गजेंद्र गवई, पी. एस. गवळे, डॉ. गणपत वाडेकर, ॲड. सुजाताताई पोहरे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे, असे कार्यक्रमाचे मुख्य संयोजक बाबू शिंदे यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

# राज्यमाता गोमाता संवाद यात्रेत मोठ्या संख्येने उपस्थित राहा –हभप माधव महाराज केंद्रे माळाकोळीकर

**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र गोसेवा आयोग व पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासनाच्यावतीने आयोजित राज्यमाता गोमाता संवाद यात्रेचे रविवार, दि. २८ जून रोजी दुपारी ४ वाजता आगमन होणार आहे.

या यात्रेचा २२ जून २०२६ रोजी पुणे येथून मोठ्या थाटात शुभारंभ झाला असून, दि. ५ जुलै २०२६ रोजी या यात्रेचा समारोप महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व पशुसंवर्धन मंत्री यांच्या उपस्थितीत होणार आहे. दरम्यानच्या काळात ही यात्रा संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हास्थानी जाणार असून, या यात्रेत गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा (राज्यमंत्री दर्जा), पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील, गोसेवा आयोगाचे सदस्य डॉ. सुनील सूर्यवंशी, उद्धव नेरकर, संजय भोसले, मनीष वर्मा तसेच सदस्य सचिव डॉ. श्यामकांत पाटील आदी पूर्ण वेळ उपस्थित राहणार आहेत.



महाराष्ट्र गोसेवा आयोग व पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने गोसंवर्धन, गोसेवा आणि भारतीय संस्कृतीतील गोमातेचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यमाता गोमाता संवाद यात्रा आयोजित करण्यात आली आहे. यात्रेद्वारे राज्यातील ३५ जिल्ह्यांत १५ दिवसांत ६ हजार कि. मी. प्रवास करून सुमारे १५ हजार गोशाळा संचालक, गोरक्षक, गोपालक व शेतकरी यांच्याशी संवाद साधला जाणार आहे. या उपक्रमात १ हजार गोशाळांचा सहभाग असेल.

गोसेवा आयोगाच्या स्थापनेनंतर तीन वर्षात केलेल्या कार्याचा आढावा, गोशाळांसाठीच्या योजना, गोपालना विषयी शासनाची भूमिका जनमानसात मांडण्यासाठी तसेच लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांना गोसेवा आयोगामार्फत चालणाऱ्या योजनांची माहिती व्हावी व पशुसंवर्धन विभाग आणि गोशाळा त्याचबरोबर पोलीस प्रशासन आणि गोशाळा यांच्यामध्ये सुसंवाद घडून यावा यासाठी या संवाद यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या संवाद यात्रेच्या यशस्वीतेसाठी नांदेड जिल्ह्यातील सर्व गोभक्त, गोरक्षक व गोशाळा संचालक परिश्रम घेत आहेत.

गोमातेच्या संवर्धनासाठी, भारतीय संस्कृतीच्या जतनासाठी व ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी आयोजित या ऐतिहासिक उपक्रमात सर्व गोभक्त-गोप्रेमी, गोरक्षक, गोपालक शेतकरी, विहिंप, बजरंग दल व रा.स्व. संघाचे गोरक्षा कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन भागवताचार्य, नांदेड विभाग विहिंप संत प्रमुख तथा श्रीकृष्ण गोशाळा पोखरभोसी ता. लोहाचे अध्यक्ष माधव महाराज केंद्रे माळाकोळीकर यांनी केले आहे.

**पान १ वरून...**

**शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य...**

रात्री नांदेड जिल्हा दौऱ्यावर आल्यानंतर ते उशिरा पत्रकार परिषदेत बोलत होते.

यावेळी रोहित पवार यांनी सरकारवर सडकून टीका करत शेतकऱ्यांच्या मागण्या त्यांच्या पदरात पाडून देण्यासाठी आम्ही रस्त्यावर तर आमचे नेते, शिवसेना व काँग्रेससह विधिमंडळात सरकारशी दोन हात करत आहेत. मात्र संबंधित कृषी मंत्री या सर्व बाबीचे खापर मुख्यमंत्र्याकडे बोट दाखवून फोडत आहेत. लोकांना विश्वासात घेऊन हा लढा लढावा लागणार आहे. राज्यातील २२ लाख शेतकरी कांदा उत्पादक आपल्या पिकाला भाव मिळेल या आशेवर आहेत तर तिकडे सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकरी देशोधडीला लागला आहे.

नांदेडच्या जिल्हा बँकेकडून फक्त १४ टक्के कर्ज देण्यात आले आहे. ३४ हजार ४५४ खातेदार असताना फक्त १५५ कोटी कर्ज देण्यात आले आहे. बाकी सर्व कर्ज नॅशनल बँकेकडून देण्यात आले पण नेमके किती आणि कोणाला दिले याचा अहवाल सरकारकडे देण्यात आला नाही. पीक विम्यासाठी शेतकरी खेटे मारतात. मागच्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमध्ये एकट्या नांदेड जिल्ह्यात ६० लाख २८ हजार हेक्टर वरील पीके वाया गेली, परंतु एवढ्या नुकसानीसाठी २२०० कोटी रुपये मिळायला पाहिजे होते परंतु फक्त ८८६ कोटी रुपये मिळाले. शेतकऱ्यांच्या पिकाला योग्य भाव मिळाला पाहिजे, यासाठी येत्या २९ जून रोजी मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर येथे मोठे आंदोलन करण्यात येणार आहे. मुंबई येथे अधिवेशन सुरू असताना आमचे आंदोलन हे मोठ्या प्रमाणात उग्र असणार आहे. सरकारला गुडघ्यावर आणल्याशिवाय आता पर्याय नाही. यासोबतच अजित पवार अपघात प्रकरणीही मी समाधानी नसून सरकार तपास योग्य दिशेने करत नसल्याचा आरोपही त्यांनी केला. नांदेड सचखंड गुरुद्वारा हे शिखांची दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते. परंतु या ठिकाणीही ५६ वर्षांपूर्वीचा कायदा बदल करण्याचा घाट हे सरकार घालत आहे. ही घटना निषेधार्थ असून शीख समाजाला कुठेतरी विश्वासात घेऊनच धार्मिक स्थळी निर्णय घ्यायला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

# मुदखेड नगरपरिषदेत एकल महिला दिन उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** – महिला व बालविकास विभागाच्या सूचनेनुसार मुदखेड नगरपरिषदेच्या वतीने नगराध्यक्षा विश्रांती माधव पाटील कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत एकल महिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.



मुदखेड नगरपरिषदेत झालेल्या या कार्यक्रमाला शहरातील ५० हून अधिक एकल महिलांनी उपस्थिती लावली होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नगराध्यक्षा विश्रांती कदम यांनी एकल महिलांच्या समस्या जाणून घेतल्या आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली.

नगराध्यक्षा विश्रांती कदम म्हणाल्या, समाजात एकल महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. शासनाच्या संजय गांधी निराधार, अन्नपूर्णा, घरकुल व महिला बचत गट योजनांचा लाभ प्रत्येक पात्र महिलेपर्यंत पोहोचवणे हे आमचे कर्तव्य आहे.

समाजात सन्मान वाढविण्यासाठी 'विधवा' या शब्दाऐवजी 'एकल महिला' अशी संज्ञा वापरून गाव आणि शहरातील सर्व एकल महिलांना संबोधित करून त्यांच्या समस्या, व अडचणींवर शासनाकडून काय उपाययोजना करता येतील यावर चर्चा करण्यात आली.

महिला व बालविकास विभागाने दिलेल्या सुचनेनुसार एकल महिला दिनानिमित्त उपस्थित एकल महिलांचा शाल व पुष्पहार देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला. या एकल महिला दिवस कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लेखापाल शशीकांत पौळ यांनी केले.

यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी माधव पाटील कदम, उपनगराध्यक्ष इमरान शेठ मच्छीवाले, नगरसेविका तथा महिला बाल विकास कल्याण सभापती रेखा नितीन चौदंते, नगरसेवक संजय आऊलवार, नगरपरिषद कर्मचारी ओ. एस. मीराताई गुंडे, शैलजा फुलारी, प्रियंका यंबल, मंगल होटकर, यांच्यासह एकल महिला व नगरपरिषद कर्मचारी उपस्थित होते.

# अंतर्मन

## आव्हाने अन् आनंद तुमच्या दारावर कसे येतात...

# जन्मतारखेत 7 अंक?

**अंकशास्त्रानुसार जन्मतारखेत ७ या अंकाची पुनरावृत्ती झाल्यास तुमच्यासाठी अडचणी येऊ शकतात. यामुळे तुमच्या मनात अशुभ संकेतांची जाणीव होते. उदाहरणार्थ, जर तुमची जन्मपत्रिका ७, ०७, १९९७ असेल, तर याचा अर्थ असा की तुमच्या जन्मपत्रिकेत ७ या अंकाची तीन वेळा पुनरावृत्ती झाली आहे.**

## जन्मपत्रिकेतील 7 अंकाचा अर्थ काय?



जर तुमच्या जन्मपत्रिकेत ७ हा अंक एकदा आला असेल, तर ते तुम्हाला खूप आध्यात्मिक बनवते. जरी तुम्ही खूप आध्यात्मिक असाल, तरी तुम्ही प्रेम, आरोग्य आणि आर्थिक बाबींमध्ये थोडे निष्काळजी असू शकता, ज्यामुळे नंतर समस्या निर्माण होऊ शकतात. वास्तुगुरू मान्या यांच्या मते, तुम्ही तुमच्या आरोग्याची आणि कामाची थोडी काळजी घेतली पाहिजे आणि त्याच वेळी तुमच्या मागील चुकांमधून शिकले पाहिजे. जर तुमच्या जन्मतारखेत ७ हा अंक दोनदा आला असेल, तर ते तुम्हाला बरेच आध्यात्मिक बनवते. तुमचा कल ज्योतिषशास्त्राकडे अधिक असतो. तुम्ही नेहमी गणितीय बाबींच्या पलीकडे असता आणि अध्यात्मावर अधिक लक्ष केंद्रित करता. असे लोक अगदी कठीण तांत्रिक समस्याही सहजपणे सोडवू शकतात. जर तुमच्या जन्मतारखेत ७ हा अंक तीनदा आला असेल, तर तुमच्या आयुष्यात अनेक चढ-उतार येतील. तुम्ही एक लढवय्ये आहात आणि आयुष्यात अनेक समस्या आणि आव्हानांना सामोरे जाता. असे लोक दिवास्वप्न पाहण्याकडे झुकतात. अशा लोकांसाठी गुंतवणूक करण्यापूर्वी सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. त्यांच्या आजूबाजूचे लोक त्यांची फसवणूक करू शकतात. म्हणून कोणावरही आंधळेपणाने विश्वास ठेवू नका. जर तुमच्या जन्मतारखेत ७ हा अंक चारदा आला असेल, तर ते एक मोठे आव्हान ठरू शकते. अशा लोकांना अगदी लहानसहान सुख मिळवण्यासाठीही खूप संघर्ष करावा लागतो.

# गृहप्रवेशाची सोपी पद्धत, जी संपूर्ण आयुष्यात आनंद अन् समृद्धी आणेल...

**जेव्हा ईश्वरी कृपेने तुम्हाला स्वतःचे घर बांधण्याची संधी मिळते, तेव्हा गृहप्रवेश सोहळ्यादरम्यान तुम्ही काही विशेष गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. अनेकदा घराचे बांधकाम अपूर्ण असतानाच लोक गृहप्रवेश सोहळ्याला जातात. वास्तू तत्त्वांनुसार, गृहप्रवेश सोहळा घराचे बांधकाम पूर्ण झाल्यावरच आयोजित केला पाहिजे, त्याआधी नाही. चला तर मग, गृहप्रवेश सोहळ्यादरम्यान लक्षात ठेवण्यासारख्या महत्त्वाच्या गोष्टी जाणून घेऊया...**



» अनेकदा बांधकाम अपूर्ण असतानाच लोक गृहप्रवेश करतात. वास्तुशास्त्रानुसार, तळमजला पूर्णपणे बांधून झाल्यावरही, जर दुसरा मजला पूर्ण झाला नसेल, तर संपूर्ण इमारत पूर्ण होईपर्यंत गृहप्रवेश सोहळा आयोजित करू नये. वास्तु नियमांचे काटेकोरपणे पालन केल्यास गृहप्रवेश सोहळ्यापूर्वी घरात कोणताही स्वयंपाक करू नये, म्हणजेच स्टोव्ह किंवा ओव्हन पेटवू नये. गृहप्रवेश सोहळ्यापूर्वी घरातील स्नानगृह किंवा शौचालयाचा वापर कोणीही करू नये.

» गृहप्रवेश सोहळ्यासाठी घर व्यवस्थित स्वच्छ करून सजवावे. विशेषतः, प्रवेशद्वार केळीचे झाड, आंब्याच्या पानांची सजावट, सुगंधी फुले इत्यादींनी सजवावे. गृहप्रवेश सोहळ्याच्या आदल्या रात्री वास्तुशांती (वास्तुपूजा), वास्तुहोम, वास्तुबली, रक्षाहोम, सुदर्शनहोम इत्यादी विधी करावेत. यापूर्वी एक गाय आणि वासरू घरात सोडावे आणि संपूर्ण घर पवित्र पाण्याने शुद्ध करावे.

» गृहप्रवेशाच्या दिवशी मुख्य प्रवेशद्वार हळदीने रंगवलेल्या आणि वाळवलेल्या पांढऱ्या कापडाने झाकले जाते आणि द्वारपूजा केली जाते. गृहप्रवेश सोहळ्यानंतर देवतेची मूर्ती प्रार्थना कक्षात स्थापित केली जाते आणि दूध उकळणे, गण-होम, नवग्रह-होम, सत्यनारायण पूजा, पाहुण्यांना आणि कामगारांना स्वादिष्ट भोजन देणे आणि बांधकाम कामात गुंतलेल्या कारागिरांना भेटवस्तू देणे यांसारखे इतर विधी आणि औपचारिकता पार पाडल्या जातात.

» गृहप्रवेश सोहळ्यानंतर संपूर्ण घर दिव्यांनी उजळले पाहिजे आणि कुटुंबाने त्याच दिवसापासून घरात राहण्यास सुरुवात केली पाहिजे. काही लोक गृहप्रवेश सोहळ्यानंतर घराला कुलूप लावून आपल्या मूळ घरी परत जातात, जे अयोग्य आहे. जर काही कारणास्तव ते नवीन घरात राहू शकत नसतील, तर गृहप्रवेश सोहळा पुढे ढकलला पाहिजे.

# दुकान अन् व्यवसायात प्रगतीसाठी शनिवारी करा हे उपाय... तुमची कमाई वाढेल!

**जर तुम्हाला तुमच्या दुकानात किंवा व्यवसायात मंदी, अडथळे किंवा तोटा जाणवत असेल, तर ते नकारात्मक ऊर्जेच्या उपस्थितीमुळे किंवा शनी दोषाच्या प्रभावामुळे असू शकते. जर एखाद्या ठिकाणी नकारात्मक ऊर्जा लक्षणीयरीत्या वाढली असेल किंवा शनी दोषाचा प्रभाव असेल, तर काही विशिष्ट उपाय अंमलात आणले पाहिजेत. ज्योतिषशास्त्रानुसार, व्यवसायातील नफा केवळ भांडवलातूनच नव्हे, तर कर्म, प्रतिष्ठा आणि वेळ यांच्यातील संतुलनातून येतो. त्यामुळे, हे संतुलन मजबूत करण्यासाठी शनिवारचे उपाय एक साधन मानले जातात. हे उपाय नकारात्मक ऊर्जा आणि अडथळे दूर करतात. इतकेच नाही, तर ते शनि दोषाचा प्रभाव देखील कमी करतात. चला, ज्योतिषी पिनाकी मिश्रा यांच्याकडून व्यवसाय आणि व्यवसायाच्या वाढीसाठी शनिवारच्या उपायांबद्दल सविस्तर जाणून घेऊया...**



» व्यवसायातील अडथळे दूर करण्यासाठी उपाय : जर तुमच्या व्यवसायात किंवा व्यापारात अडथळे येत



असतील, तर तुम्ही शनिवारी एक सोपा उपाय करून पाहू शकता. ज्योतिषशास्त्रानुसार शनिवारी पिंपळाच्या झाडाची पूजा करण्याला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे, या दिवशी पिंपळाच्या झाडाखाली मोहरीच्या तेलाचा दिवा नक्की लावा. ज्योतिषी पिनाकी मिश्रा स्पष्ट करतात की, पिंपळाचे झाड कर्मफळे आणि शनि ऊर्जेचा वाहक मानले जाते. म्हणून, हा उपाय केल्याने व्यवसायातील अदृश्य अडथळे कमी होऊ लागतात. थांबलेल्या कामाला गती मिळते आणि निर्णयक्षमता व संयमही वाढतो.

» अनावश्यक खर्च कमी करण्याचा उपाय : शनिवारी, शमीचे पान घेऊन ते आपल्या दुकानाच्या किंवा व्यवसायाच्या तिजोरीत ठेवा. ज्योतिषशास्त्रानुसार, शमीचे झाड स्थिरता, संरक्षण आणि विजयाचे प्रतीक मानले जाते. म्हणून, शनिवारी शमीच्या पानाने हा उपाय केल्याने तुमची संपत्ती जमा करण्याची क्षमता वाढते. याव्यतिरिक्त, अनावश्यक खर्च कमी होतो, ज्यामुळे तणाव कमी होतो. हा उपाय व्यवसायाची स्थिरता देखील मजबूत करतो.

» उत्पन्न आणि व्यवसाय वाढवण्याचा उपाय : हिंदू धर्म आणि धर्मग्रंथांमध्ये, गरजूंना भोजन देणे अत्यंत शुभ मानले जाते. शनी हा श्रम, सेवा आणि कर्मयोगासाठी जबाबदार असलेला ग्रह आहे. म्हणून, शनिवारी आपल्या क्षमतेनुसार कामगारांना किंवा गरजूंना भोजन द्यावे. हा उपाय व्यवसायात सहकार्य आणि पाठिंबा वाढवतो आणि कर्मचाऱ्यांचा विश्वास दृढ करतो. याव्यतिरिक्त, व्यक्तीला त्यांच्या दुकानात किंवा व्यवसायात कमाईच्या नवीन संधी निर्माण होतात.

» नकारात्मक ऊर्जा दूर करण्याचा उपाय : शनिवारी, आपल्या दुकानाच्या मुख्य प्रवेशद्वारावर काळे तीळ अर्पण करा. ज्योतिषशास्त्रानुसार, काळे तीळ शनी तत्त्वाशी संबंधित आहेत. त्यामुळे, शनिवारी हा उपाय केल्याने नकारात्मक ऊर्जा दूर होण्यास मदत होते आणि सकारात्मक ऊर्जेलाही चालना मिळते. हा उपाय भक्तिभावाने केल्याने सकारात्मक व्यावसायिक वातावरण टिकून राहते आणि व्यवसायाची सुरळीत प्रगती सुनिश्चित होते.


» शनीचा प्रभाव शांत करण्यासाठी... : अनेकदा शनीच्या प्रभावामुळे तुम्हाला तुमच्या दुकानात आणि व्यवसायात अडथळे आणि समस्यांना सामोरे जावे लागू शकते. अशा परिस्थितीत, शनिवारी काळ्या कुत्र्याला तेल लावलेला पाव खाऊ घाला. शनीचा प्रभाव शांत करण्यासाठी हा उपाय अत्यंत प्रभावी मानला जातो. असे केल्याने व्यवसायातील आर्थिक नुकसानीचा धोका कमी होतो. याव्यतिरिक्त व्यवहारातील अडथळे दूर होतात आणि व्यवसायात नफा होण्याची शक्यता निर्माण होते.



# तणावात असाल तेव्हा गीतेतील हा संदेश आठवा, तुमचा तणाव नाहीसा होईल...

**जेव्हा कधी आपल्याला जीवनात समस्या येतात आणि त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नाही, तेव्हा गीतेचे ज्ञान आपल्याला योग्य मार्ग दाखवते. भगवान श्रीकृष्णांनी गीतेत जीवनातील जवळजवळ प्रत्येक समस्येचा सामना कसा करावा हे सविस्तरपणे सांगितले आहे. म्हणून, जेव्हा कधी तुम्ही तणावात असाल, तेव्हा गीतेतील हा श्लोक वाचा...**

जेव्हा तुम्ही तणावात असता, तेव्हा तुम्हाला जे करायचे आहे ते तुम्ही करू शकत नाही आणि परिस्थिती सुधारण्याऐवजी अधिकच बिघडते. म्हणून, जेव्हा कधी तुम्ही तणावात असाल, तेव्हा शांत व्हा आणि भगवान श्रीकृष्णांनी गीतेत काय सांगितले आहे याचा विचार करा. वास्तविक पाहता, भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतेची शिकवण दिली, पण येथे अर्जुन केवळ एक माध्यम आहे. वास्तविक पाहता देवाने हा संदेश आपल्या सर्वांपर्यंत, सामान्य माणसांपर्यंत पोहोचवला आहे. अर्जुनाला त्या शिकवणीची गरजही नव्हती, कारण देवाने वारंवार सांगितले आहे की अर्जुन आणि श्रीकृष्ण वेगळे नाहीत; ते एकाच तत्त्वातून जन्मले आहेत. श्रीकृष्ण मानवांना म्हणाले, की तुम्हाला काहीतरी गमावण्याच्या भीतीमुळे तणाव जाणवतो. गमावण्याची भीती सोडून द्या. कारण जो व्यक्ती काही मिळाले म्हणून आनंदी होतो आणि काही गमावल्यानंतर दुःखी, तो व्यक्ती नेहमी अस्वस्थ असतो. काही मिळवूनही ते गमावण्याच्या भीतीमुळे तो आनंदी राहू शकत नाही. मिळवणे आणि गमावणे यात नेहमी समभाव ठेवा, कारण या विश्वात काहीही कायम टिकत नाही. पण जर तुम्ही हे स्वीकारले की आज त्रास असला तरी उद्या आनंद असेल, तर तुम्ही कधीही चिंताग्रस्त किंवा तणावग्रस्त होणार नाही. तुमच्या नियंत्रणात केवळ तुमचे कर्तव्य आहे, म्हणून जे तुमच्या हातात आहे त्याचा खऱ्या मनाने उपयोग करा. काळ सूर्यासारखा पुढे सरकतो. सूर्य सकाळी लालसर रंगाने उगवतो, दुपारी पूर्ण तारुण्यात येतो आणि संध्याकाळी पुन्हा मावळतो, पण तिथेही तो सूर्योदयाच्या वेळी जसा होता तसाच राहतो; त्याचा लाल रंग फिका पडत नाही. सूर्य तुमच्यासमोर एक जिवंत उदाहरण आहे. म्हणून, नियमितपणे सूर्योदयापूर्वी उठा आणि सूर्यदेवाचे दर्शन घ्या, तसेच सूर्यास्ताच्या वेळी सूर्याला नमस्कार करा. हारण्याच्या भीतीशिवाय आपले काम करा, म्हणजे सर्व ताण नाहीसा होईल. माझ्या मित्रांनो, हे करून बघा, आणि तुम्हाला हलके व उत्साही वाटेल. श्रीमद् भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील ५७ व्या श्लोकात म्हटले आहे :यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम्। नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।। म्हणजेच जो मनुष्य कोणत्याही परिस्थितीत, मग तो सुखाचा काळ असो वा दुःखाचा, एकाच स्थितीत राहतो. तो चांगल्या फळांमुळे आनंदी होऊन उल्हसितही होत नाही आणि संकटांमुळे घाबरून दुःखात बुडूनही जात नाही; तोच ज्ञानी आणि स्थिर बुद्धीचा असतो. असा मनुष्य कोणत्याही गोष्टीबद्दल कधीही तणावग्रस्त होत नाही आणि तो अंतर्मनातून, म्हणजेच स्वतःच्या आतून आनंद साजरा करतो. तर मग तुम्ही काय करावे, तणाव कायम ठेवावा की सर्व काही ईश्वरी इच्छेवर सोडून सकारात्मक राहावे?



# माता पार्वतीच्या 10 महाविद्या रूपांचे रहस्य काय?

## त्यांना पाहून भगवान शिवदेखील आश्चर्यचकित झाले होते...

**दशमविद्या दहा प्रकारच्या शक्तींचे प्रतीक आहेत आणि त्या वेगवेगळ्या उद्देशांसाठी शिवाने वरदान म्हणून निर्माण केल्या आहेत. दशमविद्या साधकाला आनंद आणि मोक्ष दोन्ही प्रदान करतात. दशमहाविद्या (दहा महाविद्या) देवी पार्वतीच्या शरीरातून प्रकट झाल्या. जेव्हा परमेश्वर महादेवाने देवी पार्वतीला तिचे वडील दक्ष यांच्या यज्ञात उपस्थित राहण्यास नकार दिला, तेव्हा ती क्रोधित झाली आणि तिने एक उग्र रूप धारण केले. जेव्हा भगवान शिवाने जवळून पाहिले, तेव्हा दहाही दिशांना पार्वतीची विविध दिव्य रूपे पाहून ते थक्क झाले...**

## देवी पार्वतीची 10 महाविद्या रूपे

भगवान शिवाला आपली दहा महाविद्या रूपे दाखवताना देवी पार्वती म्हणाली, 'स्वामी! तुमच्यासमोर उभी असलेली सावळी देवी काली आहे. तुमच्या वर असलेली महाकालाचे प्रतिनिधित्व करणारी निळसर देवी तारा आहे. तुमच्या पश्चिमेला उभी असलेली कापलेले शीर धारण केलेली सावळी देवी छिन्नमस्तिका आहे. तुमच्या डावीकडे देवी भुवनेश्वरी आहे. तुमच्या मागे शत्रूंचा संहार करणारी देवी बगलामुखी आहे. तुमच्या आग्नेयेला विधवेच्या रूपात धूमावती आहे. तुमच्या नैऋत्येला देवी त्रिपुरसुंदरी आहे. तुमच्या वायव्येला मातंगी आहे. ईशान्येला देवी षोडशी आहे. आणि मी स्वतः भैरवीच्या रूपात उपस्थित आहे.'



## कसे आहे माता धूमावतीचे रूप?

सर्व महाविद्यांपैकी धूमावतीचे रूप सर्वात विद्रूप आहे. आपल्या शत्रूंच्या मनात भीती निर्माण करण्यासाठी तिने हे रूप धारण केले आहे. जरी तिचे अंतरंग करुणामय असले तरी तिचे बाह्य रूप अत्यंत भयंकर आहे. ती एक विधवा असून, मळके कपडे घालते. तिचे केस अव्यवस्थित आणि जाडसर आहेत. तिच्या रथाच्या ध्वजावर कावळ्याचे चिन्ह आहे. तिच्या हातात एक भाला आहे. तिचे नाक मोठे आणि रुंद असून तिचे डोळे वाकडे आहेत. धार्मिक ग्रंथांमध्ये आढळणाऱ्या वर्णनानुसार, ही देवी आपल्या शत्रूंना गिळंकृत करण्यास आणि त्यांचे रक्त पिण्यास उत्सुक असते. ती भयंकर आणि संघर्षप्रेमी आहे. जगाच्या अशुभ स्थितीची अधिष्ठात्री देवता म्हणून तिला त्रिवर्णा, विरालदंता, चंचलाविधवा, मुक्तकेशी, शूर्पहस्ता, कलहप्रिया, काकध्वजिनी आणि इतर विशेषणांनी संबोधले जाते. ज्येष्ठ शुक्ल अष्टमीला मोठ्या संख्येने भक्तगण धार्मिक श्रद्धेनुसार माता धुमावतीचे दर्शन घेतात आणि तिला काळ्या तिळाची पोटली व एक नारळ अर्पण करून इच्छा मागतात.

# मांजरा सीड्स घोटाळा प्रकरणातील मुनिमास उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर

**छत्रपती संभाजीनगर/लातूर, (प्रतिनिधी)–** मांजरा सीड्स प्रा. लि., हरंगुळ एमआयडीसी, लातूर या कंपनीच्या सोयाबीन खरेदी व शेतकरी देयक प्रकरणात अटक करण्यात आलेल्या कंपनीच्या लेखापाल (मुनीम) निवृत्ती लक्ष्मण आलापुरेस मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने जामीन मंजूर केला आहे. न्यायमूर्ती सिद्धेश्वर एस. ठोंबरे यांनी हा आदेश दिला.

या प्रकरणात एमआयडीसी लातूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १७१/२०२६ दाखल करण्यात आला होता. भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१८(४) व ३(५) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. फिर्यादीसह अनेक शेतकऱ्यांनी मांजरा सीड्स कंपनीकडे सोयाबीन जमा केले होते. मात्र, मालाची विक्री करूनही कंपनीकडून देय रक्कम अदा करण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला होता. सदर प्रकरणात अंतीम अहवालानुसार एक कोटी एकतीस लाख पेक्षा जास्त रकमेची फसवणूक केल्याच्या आरोप करण्यात आला आहे.

आरोपीच्या वतीने ड. गजानन कदम यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना अर्जदार हा केवळ कंपनीत मुनीम (लेखापाल) म्हणून कार्यरत होता व कंपनीच्या आर्थिक धोरणात्मक निर्णयांशी त्याचा संबंध नव्हता, असे सांगितले. तसेच कंपनीचे व्यवहार व देयकांबाबतचे निर्णय मुख्य आरोपी आणि व्यवस्थापनाकडून घेतले जात असल्याचा दावा करण्यात आला.

न्यायालयाने निरीक्षण नोंदविताना सांगितले की, तपासातील उपलब्ध सामग्रीनुसार अर्जदार हा मुनीम (लेखापाल) म्हणून कार्यरत होता आणि त्याची भूमिका प्रामुख्याने शेतकऱ्यांकडून सोयाबीन स्वीकारताना पावत्या देण्यापुरती दिसून येते. शेतकऱ्यांच्या देयकांबाबत निर्णय घेण्याचा अधिकार किंवा मालाच्या विल्हेवाटीबाबत त्याच्याकडे अधिकार असल्याचे प्रथमदर्शनी दिसत नाही. तपास पूर्ण झाला असून दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. अर्जदाराविरुद्धचे पुरावे प्रामुख्याने दस्तऐवजी स्वरूपाचे असून ते तपास यंत्रणेच्या ताब्यात असल्याने पुढील कोठडीची आवश्यकता नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. त्यानुसार १५ हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर व एका जामीनदाराच्या हमीवर अर्जदारास जामीन मंजूर करण्यात आला. आरोपीच्या वतीने ड. गजानन कदम यांनी यशस्वी युक्तिवाद केला तर त्यांना ड. अमित तांदुळकर व ॲड. निवृती कराड यांनी सहाय्य केले. तर ड. एस. व्ही. हंगे सरकारी वकील यांनी सरकारी पक्षातर्फे काम पाहीले.

## बनावट केळी लागवड दाखवून पीक विमा; दोषींवर कारवाई करणार -कृषी मंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)** – जळगाव जिल्ह्यात केळीची बनावट लागवड दाखवून पीक विमा मिळविल्याच्या प्रकरणाची चौकशी सुरू असून, चौकशीत जे दोषी आढळतील त्यांच्यावर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी गुरुवारी विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

यासंदर्भात सदस्य अजय चौधरी यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्याबाबत मंत्री भरणे म्हणाले की, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग प्लिकेशन सेंटरमार्फत रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संबंधित पीक क्षेत्राची तपासणी करण्यात आली. या तपासणीत ४४ हजार ०४१.८२ हेक्टर क्षेत्रावर प्रत्यक्षात केळीचे पीक नसतानाही पीक विमा घेतल्याचे आढळून आले. तसेच, १ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर २०२५ या कालावधीत करण्यात आलेल्या तांत्रिक पडताळणीत २७ हजार ४१६ अर्जदारांनी केळीची लागवड नसताना २८ हजार ४७५.०१ हेक्टर क्षेत्रासाठी पीक विमा घेतल्याचे निदर्शनास आले.

# मराठा- कुणबी जात प्रमाणपत्र व पडताळणी तातडीने करावी - प्रभारी आयुक्त खुशालसिंह परदेशी

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – मराठा आरक्षण उपसमितीने दिलेल्या विविध सूचनांनुसार विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये मराठा–कुणबी जात प्रमाणपत्र तसेच जात पडताळणी प्रमाणपत्रे निर्धारित मुदतीत वितरित करण्याची कार्यवाही पूर्ण करावी. तसेच प्रलंबित प्रकरणांवर नियमानुसार कार्यवाही करून त्यांचा तातडीने निपटारा करावा, असे निर्देश प्रभारी आयुक्त खुशालसिंह परदेशी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, लातूर, धाराशिव, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यांमधील मराठा–कुणबी जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र वितरणाच्या कामकाजाचा आढावा श्री. परदेशी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे घेतला.

यावेळी अपर आयुक्त मंजुषा मिसकर व तहसीलदार के. के. भदाणे उपस्थित होते. तसेच सर्व जिल्ह्यांतील जात पडताळणी समितीचे अध्यक्ष, उपविभागीय अधिकारी आणि संबंधित तहसीलदार ऑनलाइन माध्यमातून बैठकीस उपस्थित होते. बैठकीत जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र व पडताळणीसाठी प्राप्त अर्ज, निकाली काढलेले अर्ज, अवैध अर्ज तसेच प्रलंबित अर्जांची कारणांसह माहिती सादर करण्यात आली.



यावेळी बोलताना श्री. परदेशी म्हणाले की, मराठा आरक्षण उपसमितीने मराठा–कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबाबत विविध सूचना केल्या आहेत. त्या अनुषंगाने सर्व जिल्ह्यांनी शासनाच्या नियमानुसार जलदगतीने कार्यवाही करून आवश्यक अहवाल लवकरात लवकर सादर करावेत. हे अहवाल शिंदे समितीसमोर मांडण्यात येणार आहेत. तसेच कोणताही अर्ज ९० दिवसांपेक्षा अधिक काळ प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. सध्या ९० दिवसांहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा नियमानुसार तातडीने निपटारा करण्यावरही त्यांनी भर दिला. अपर आयुक्त मंजुषा मिसकर यांनीही संबंधित अधिकाऱ्यांना प्राप्त अर्जांवर वेळेत कार्यवाही करण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच अवैध ठरविण्यात आलेल्या अर्जांबाबत स्पष्ट कारणे नमूद करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

# जिल्हा बॅंक निवडणूक : अंबादास दानवे मविआच्या पॅनलऐवजी भाजप-शिंदे गटासोबत

**मुंबई (प्रतिनिधी)** – शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते आमदार अंबादास दानवे यांनी जिल्हा बँक निवडणुकीत भाजप आणि महायुतीसोबत संधान बांधले आहे. महायुती आणि महाविकास आघाडी असे दोन पॅनल झालेले असतानाही दानवे यांनी मविआऐवजी महायुतीच्या पॅनलमध्ये सामील होण्यास पसंती दिली आहे. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

जिल्हा बँक निवडणुकीत आत्तापर्यंत ८ जण बिनविरोध संचालक झाले असून, १२ जागांसाठी निवडणूक होत आहे. बिनविरोधचा प्रयत्न फसल्यानंतर महायुती आणि मविआचे पॅनल बनले असून, त्यांच्यात थेट लढत होत आहे. विशेष म्हणजे मविआचे पॅनल बनले असतानाही ठाकरे गटाचे नेते आ. अंबादास दानवे यांनी महायुतीच्या पॅनलमधून निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. बँक निवडणुकीतील हा निर्णय स्थानिक पातळीवरील असला तरी, चार दिवसांपूर्वी ठाकरे गटाच्या खासदारांनी शिंदेसेनेत प्रवेश केल्याच्या पार्श्वभूमीवर आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या संपूर्ण बाबीवर बँकेत पक्षीय राजकारण नसते अशी भूमिका अंबादास दानवे यांनी मांडली आहे. त्यामुळे अंबादास दानवे यांच्याकडून हे नव्या राजकारणाचे संकेत आहेत का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्हा बँक निवडणुकीत १२ संचालकपदासाठी ३१ उमेदवारांमध्ये निवडणुकीचा



सामना रंगणार आहे. नवनिर्वाचित आ. सुहास शिरसाट, किशोर शितोळे, राजू शिंदे, हर्षदा शिरसाट, निशांत पाटील, अर्जुन पाटील, एकनाथ जाधव, राजू भुमरे, रवींद्र संचेती, देवयानी डोणगावकर, श्रद्धा माने, प्रदीप शिंदे, गोकुळसिंग राजपूत, बाबुराव पवार, कविता घुगे यांच्यासह अनेकांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत.

बँकेच्या २१ संचालकपदांसाठी १२० उमेदवारांनी अर्ज दाखल केलेले होते. त्यात ८३ उमेदवारांनी माघार घेतली. तर वैयक्तिक मतदार संघातून दाखल एकमेव अर्ज छाननीतच अवैध ठरला. त्यामुळे आता हे पद रिकामेच राहणार आहे. एकूण २० संचालकपदांसाठीच ही निवडणूक होत असून यापैकी ८ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. उर्वरित १२ जागांसाठी मंत्री अतुल सावे, कल्याण काळे, अनुराधा चव्हाण, अंबादास दानवे यांच्यासह ३१ उमेदवार रिंगणात आहेत. दानवे यांच्या या भूमिकेमुळे संपूर्ण राज्याचे लक्ष आता छत्रपती संभाजीनगर जिल्हा बँकेच्या निवडणुकीकडे लागून राहिले आहे.

## अमरावती येथील अभ्यासिका प्रकरणातील अनियमित्तेबाबत दोषींवर कारवाई करणार -डॉ. वुईके

**मुंबई (प्रतिनिधी)** – अमरावती शहरात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या अभ्यासिका प्रकरणातील अनियमिततेबाबात संबधित वसतिगृहाचे तत्कालीन प्रभारी गृहप्रमुख आणि गृहप्रमुख (आहरण व संवितरण) यांना निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यात येत असून चौकशीत दोषी आढळून येणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी विधानसभेत सांगितले.

अमरावती येथील आदिवासी विकास विभागामार्फत अभ्यासिका भाड्याने घेण्याच्या करारात झालेल्या अनियमितेतेबाबत सदस्य सुलभा खोडके यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य सर्वश्री विजय वडेट्टीवार, डॉ. नितीन राऊत, हरिष पिंपळे, नाना पटोले यांनी उपप्रश्न विचारात चर्चेत सहभाग घेतला. मंत्री डॉ. वुईके म्हणाले की, अमरावती शहरात आदिवासी विकास विभागाची अभ्यासिका नसल्याने परीक्षेच्या काळात अभ्यासिकेची तातडीची आवश्यकता निर्माण झाली होती. त्यामुळे जिल्हा प्रशासनाच्या सूचनेनुसार तात्पुरत्या स्वरूपात भाड्याची इमारत घेऊन अभ्यासिका सुरू करण्यात आली. या प्रक्रियेत प्रथमदर्शनी काही अनियमितता झाल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांना भाडे अदा करण्यात आलेले नाही; तसेच हा करार रद्द करण्यात आला आहे.

## मुद्रांक नोंदणी प्रकरणातील गैरव्यवहारांच्या चौकशीसाठी स्वतंत्र टास्क फोर्स

**मुंबई (प्रतिनिधी)** – महसूल विभागातील मुद्रांक नोंदणी प्रक्रियेत झालेल्या कथित गैरव्यवहारांची राज्यस्तरीय चौकशी आता अकाउंटंट जनरल (एजी) कार्यालयामार्फत केली जाणार असून त्यासाठी स्वतंत्र टास्क फोर्स स्थापन करण्यात येईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी हा निर्णय जाहीर केला. यावेळी सदस्य नाना पटोले यांनीही उपप्रश्न उपस्थित केला. मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यभर झालेल्या सर्व 'डज्युडिकेशन' प्रकरणांची सखोल चौकशी एजीमार्फत करण्यात येणार आहे.

## अवैध गौण खनिज उत्खनन रोखणे व कारवाईसाठी स्वतंत्र टास्क फोर्स -महसूल मंत्री

मुंबई (प्रतिनिधी) – अवैध गौण खनिज उत्खननाची शासनाने गंभीर दखल घेतली असून अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खन रोखण्यासाठी; तसेच अशा प्रकरणांवर कठोर कारवाईसाठी स्वतंत्र टास्क फोर्सची स्थापना करण्यात येणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

सदस्य नाना पटोले यांनी या संदर्भात विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य भास्कर जाधव यांनी सहभाग घेतला, त्यावेळी ते बोलत होते.

मंत्री बावनकुळे म्हणाले की, गडचिरोली येथील साखर फाटा येथे घडलेल्या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यासाठी परवानगी मागण्यात आली होती. मात्र, त्यासाठी विलंब झाल्याने कारवाईला उशीर झाला. यापुढे अशा प्रकारचा विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. या प्रकरणी गडचिरोली जिल्हाधिकारी यांना संबंधित गुन्हेगारांवर एमपीडीएनुसार कारवाई करण्याबाबत सूचित केले आहे.

मंत्री बावनकुळे म्हणाले की, केंद्र सरकारने खनीकर्म योजनेत जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष बनवले आहे. या समितीच्या बैठका महिन्याभरात घेतल्या जाव्यात, अशा सूचना सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या जातील.


### टी.सी. हरवली

माझी परी स्वप्नील जाधव या नावाची ८ वी पासची टीसी व कागदपत्रे उमरी ते नांदेड एसटीने प्रवास करताना हरवली आहे कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता
सीमा जाधव रा.चाभरा तांडा पो. चाभरा ता.अर्धापूर
मो.नं. ९६ ९९ ०० ३५ ६३

### टी.सी. हरवली

माझी शेख राजे शेख अजीज या नावाची बारावी पासची टी. सी. नांदेड ते देगलूर बस प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

संपर्क
शेख राजे शेख अजीज

### टी.सी. हरवली

माझी प्रित स्वप्नील जाधव या नावाची ५ वी पासची टीसी व कागदपत्रे उमरी ते नांदेड एसटीने प्रवास करताना हरवली आहे कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता
सीमा जाधव रा.चाभरा तांडा पो. चाभरा ता.अर्धापूर
मो.नं. ९६ ९९ ०० ३५ ६३

### VEHICL FOR SALE

Offer for sale of Vehicle on As is Where is Basis

| Vech No. | Year | Model |
|---|---|---|
| MH-26-BE-8494 | 2022 | ASHOK LEYLAND - 4825 |

Offer for sale of Vehicle on As is Where is Basis

All offer may of exclusive of TAX where applicable. The purchaser shall have to take all necessary steps for transferring the vehicle in his name with the RTO. Offer should reach us on or before 03/07/2026 Offer reach after the sold date the company reserve the right to reject ay or all the offer without assigning any reason what so ever. The company does not undertake any responsibility for non-receipt/loss/delay of offer documents during transit. The offer should be sent to the following address.

SUNDARAM FINANCE LIMITED
IInd Floor, Parmar Complex, Bafna T-Point, Nanded 431601
8108157969, 8108151742

**महाराष्ट्र शासन**
**सा.बां. विद्युत विभाग नांदेड**
**निविदा सूचना क्रमांक (०६) सन-२०२६-२०२७**

कार्यकारीअभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग नांदेड (दूरध्वनी क्र. ०२४६२ - २९५४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ब-१ नमुन्यातील निविदा प्रणालीव्दारे मागवित आहेत. सदरील निविदेमध्ये १२ कामे समाविष्ट असून या निविदेअंतर्गत संपुर्ण माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१. उपरोक्त एकत्रीत कामांची निविदा किंमत रुपये १.०० कोटी पेक्षा अधीक आहेत.
२. या निविदेसंबंधी संपुर्ण माहिती खाली दिलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देयात येत आहे. तसेच यापुढील सर्व बदलांची माहिती याच संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

www.mahapwd.gov.in
https://mahatenders.gov.in

कार्यकारी अभियंता,
सा.बां.विद्युत, विभाग, नांदेड

### Change In Name

My old Name is **SAAD ASHAR KHAN** Which now I am Changing as New Name **PATHAN SAAD ASHAR PATHAN JAMAL.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

:: Address ::
Sr.No. 35, Plot No. 5, Waghi Road, Barkatpura,
Nanded Nanded 431601 Maharashtra India
Mo.No. 8788443776


### Change In Name

My old Name is **AYEZA FATEMA** Which now I am Changing as New Name **AMIRA FATEMA PATHAN JAMAL.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

:: Address ::
Sr.No. 35, Plot No. 5, Waghi Road, Barkatpura,
Nanded Nanded 431601 Maharashtra India
Mo.No. 8788443776

### कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

### Change In Name

My old Name is **PATHAN JAMAL KHAN** Which now I am Changing as New Name **PATHAN JAMAL.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

:: Address ::
Sr.No. 35, Plot No. 5, Waghi Road, Barkatpura,
Nanded Nanded 431601 Maharashtra India
Mo.No. 8308245050

### जाहीर प्रगटन

आम जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार पंजाबराव देवराव काळे यांनी दिलेल्या माहीती व अधिकारावरुन मी आपणास नामदेव माधवराव कांबळे वय ४३ वर्षे, धंदा नौकरी रा. कार्ला ता. नायगाव जि. नांदेड, नांदेड वाघाळा महानगरपालिका हददीतील शेत सर्वे नंबर १४१/१ सि.स.नं. १८८९३ पैकी एक प्लॉट ज्याचा प्लॉट नं. ८२, ज्याची लांबी दक्षिण उत्तर ४५ फुट म्हणजेच १३.७१ मी. व रुंदी पूर्व पश्चिम उत्तरेकडुन ४२ फुट म्हणजेच १२.८० मी, दक्षिणेकडुन ३८ फुट ६ इंच म्हणजेच ११.७३ मी. आहे. ज्याचे क्षेत्रफळ १८११.२५ चौ. फुट म्हणजेच १६८.३३ चौ. मी आहे. हा नामदेव माधवराव कांबळे यांना माझ्या पक्षकाराला कायम स्वरुपी विक्री करत आहे. ज्याची चर्तुसिमा पुढीलप्रमाणे आहे. पुर्वस : २० फुट रुंद रोड आहे. पश्चिमेस : प्लॉट नं. ८१ आहे, दक्षिणेस : प्लॉट नं ७४ आहे. उत्तरेस : २० फुट रुंद रस्ता आहे.

माझे पक्षकार यांनी, नामदेव माधवराव कांबळे वय ४३ वर्षे, धंदा नौकरी रा. कार्ला ता. नायगाव जि. नांदेड यांच्याकडुन खरेदी करण्याचा सौदा दिनांक २५/०६/२०२६ रोजी केला आहे. सौदाचिठ्ठी करुन बयाना रक्कमही देण्यात आलेली आहे. सदर मालमत्ते बाबत काही कुणाचा आक्षेप आसल्यास त्यानी ८ दिवसाच्या आत आपला आक्षेप खालील पत्यावर नोंदवावा. जर ८ दिवसानंतर आक्षेप आला नाही तर कुणाचाही आक्षेप नाही, असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदरच्या वर्णनाच्या प्लॉट खरेदी खत करुन घेतील याची नोंद घ्यावी.

**मार्फत : ॲड. श्रृती प्रशांत येवनकर,**
**रा. कलामंदीर, नांदेड मो. नं. ७८४१००४२५९**
**प्रगटन लिहुन देणार**
**पंजाबराव देवराव काळे**
**रा. किसान नगर सोसायटी नवीन सिडको**
**नांदेड ता.जि. नांदेड**

### जाहिर प्रगटन

सर्व जनतेस व हित संबंधीतांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे 1) **गंगाधर रोहिदास भाडेकर**, रा. गाडेगांव, ता. जि. नांदेड, 2) **सुनिल भुजंगराव शिराढोणे**, रा. नांदेड, यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन खालील प्रमाणे जाहिर प्रगटन देण्यात येत आहे.

हे की, 1) पांडुरंग सखाराम तुप्पेकर, रा. जुनेगांव तरोडा बु. नांदेड, 2) अनिल विठ्ठलराव हुलकाणे, रा. अहिल्याबाई होळकर नगर, हदगांव, ता. हदगांव जि. नांदेड, 3) सुरेश सखाराम तुप्पेकर, रा. तरोडा बु. नांदेड यांनी मौजे बारड ता. मुदखेड जि. नांदेड येथील त्यांच्या मालकी व ताब्यातील स्वकष्टाने खरेदी केलेली शेतजमिन शेत गट क्र. 516 त्यातील एकुण क्षेत्रफळ 03 हेक्टर 00.36 आर त्यांचा फेरफार क्र. 973 असून, त्यांच्या मालकी व हिश्यातील शेतजमिनी पैकी 00.36 आर संपूर्ण बागायती असलेली शेती ज्याची चर्तु:सिमा पुढिल प्रमाणे आहे. पुर्वेस : शिवाजीराव नारायणराव सुर्यवंशी यांची शेती, पश्चिमेस : मंगलाबाई हारिचंद्र देशमुख यांची शेती, दक्षिणेस : नांदेड ते भोकर जाणारा महामार्ग (रोड), उत्तरेस : अशोक चंपती देशमुख यांची शेती. वरील चर्तु:सिमेच्या आतील शेतजमिन माझ्या पक्षकारांनी सौदाचिठ्ठी आधारे विकत घेण्याचा करार केला असून, त्यापैकी बयाना रक्कम सुध्दा दिली आहे. उर्वरीत रक्कम देवून रजिस्ट्री / विक्रीखत माझे पक्षकारांच्या हक्कात करुन घेण्याचे टरले आहे.

तरी सदरील शेतजमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारा बाबत कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा काही उजर, आक्षेप अंसेल किंवा कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, अधिकार, वारसा अधिकार, अतिक्रमण, वाद, कुळ, न्यायालयीन प्रकरण किंवा वरील मिळकत कोणत्याही प्रकारचा करार म्हणजेच सौदाचिठ्ठी, विक्री, गहाण, हस्तांतरण, बदली, दान, बक्षीस, शासकीय अथवा निमशासकीय बँकेजे कर्ज, बोजा खाली असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन सात दिवसाच्या आत आपले उजर, आक्षेप कागदोपत्री पुराव्यासह माझ्या कार्यालयात लेखी नोंदवावा. दिलेल्या विहित मुदतीत जर उजर, आक्षेप न आल्यास माझे पक्षकार सदरील शेतजमिन स्वत:च्या हक्कात नोंदणीकृत विक्रीखत करुन घेतील. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप गृहित धरला जाणार नाही आणि माझे पक्षकार बंधनकारक राहणार नाहीत.

करीता हे जाहिर प्रगटन.

मार्फत,
ॲड. राहुल पां. कोलते,
जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड.
मो. नं. 8177968984.

जाहिर प्रगटन देणार
1) गंगाधर रोहिदास भाडेकर
रा. गाडेगांव, ता. जि. नांदेड
2) सुनिल भुजंगराव शिराढोणे,
रा. नांदेड

### जाहीर प्रगटन

मौजे वाडी (बु.) ता.जि. नांदेड ग्राम पंचायत हद्दीतील गट नं. ४४ मधील प्लॉट नं. ५ साईज लांबी - दक्षिण-उत्तर १२ मीटर व रूंदी पूर्व-पश्चिम ९ मीटर ज्याचे एकूण क्षेत्रफळ १०८ चौ.मीटरचा प्लॉट धोंडीबाराव गोविंदराव पवार रा. आलुवडगाव ता. नायगाव जि. नांदेड यांच्याकडून बालाजी मारोती कटारे रा. आखाडा बाळापूर ता. कळमनुरी जि. हिंगोली यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा- पूर्वेस - प्लॉट नं. ६, पश्चिमेस - प्लॉट नं. ४, दक्षिणेस - ९ मीटरचा रूंद रोड व उत्तरेस - सर्व्हे नं. ४४.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत बालाजी मरोती कटारे यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**बालाजी मारोती कटारे**
**रा. आखाडा बाळापूर ता. कळमनुरी जि. हिंगोली**
**मो.नं. ८४५९८८०३५८**

### जाहिरप्रगटन

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १२८/२०२६
**शिवराज पिता संभाजी लाकडे विरुध्द निरंक**

**अर्जदार** :- शिवराज पिता संभाजी लाकडे - ३७ वर्षे,
राहणार - अरळी ता. बिलोली जिल्हा नांदेड

**विरूध्द**
निरंक
विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत **शशिकलाबाई संभाजी लाकडे** यांचा अर्जदार हा मुलगा आहे. राहणार अरळी ता. बिलोली जिल्हा नांदेड येथील रहीवाशी आहे. मयत **शशिकलाबाई संभाजी लाकडे** यांचा मृत्यु दिनांक **१७/०२/२०२६** रोजी त्यांचे राहाते घर अरळी ता. बिलोली जिल्हा नांदेड येथे कॅन्सर या आजाराने झाला आहे. मयताच्या पश्चात अर्जदार हाच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाही. असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत **शशिकलाबाई संभाजी लाकडे** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत **दिनांक १२/०८/२०२६** रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/ उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. २४ जुन, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, बिलोली

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# भोकर न्यायालय परिसरात दोन महिला वकिलांमध्ये हाणामारी

## ◆ अॅट्रॉसिटीसह परस्परविरोधी गुन्हे दाखल

**भोकर (प्रतिनीधी)** – भोकर येथील न्यायालय परिसरात कामकाजाच्या कारणावरून दोन महिला वकिलांमध्ये झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्याची धक्कादायक घटना २४ जून २०२६ रोजी घडली. या प्रकरणी दोन्ही वकिलांनी एकमेकींविरुद्ध भोकर पोलिसात तक्रार दिल्याने पोलिसांनी परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत.

अॅड. मनीषा सोनकांबळे आणि अॅड. वनिता राठोड यांच्यात गेल्या दोन वर्षांपासून न्यायालयीन कामकाजावरून वाद सुरू होते. २४ जून रोजी दुपारी १२:३० च्या सुमारास हे वाद पुन्हा विकोपाला गेले आणि भोकर न्यायालय परिसरातच दोन्ही वकिलांमध्ये शाब्दिक चकमकीनंतर झटापट झाली.

अॅड. मनीषा सोनकांबळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार अॅड. वनिता राठोड यांनी त्यांना अश्लील भाषेत शिवीगाळ केली आणि जातीवाचक उल्लेख करून अपमानित केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी पोलिसांनी बीएनएस कलम ११५ (२), २९६, ३५१ (२), ३५१(३) आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम ३ (१) (आर), ३ (१) (एस) व ३ (२) (व्हीए) नुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी एस. हाके करत आहेत.

अॅड. वनिता राठोड यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, अॅड. मनीषा सोनकांबळे यांनी त्यांना शिवीगाळ करून झटापट केली. तसेच त्यांच्या हातातील पर्स हिसकावून त्यातील १५०० रुपये काढून घेतले आणि जीवे मारण्याची धमकी दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी बीएनएस कलम ११९ (१), ३५२, ३५१ (१), ३५१ (३) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

भोकर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय सागर झाडे पुढील तपास करत आहेत. न्यायालयीन वर्तुळात या घटनेमुळे खळबळ उडाली असून, दोन महिला वकिलांच्या हाणामारीची सध्या संपूर्ण भोकर शहरात चर्चा होत आहे.

# जिल्ह्यात मासरेडमध्ये ३६ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्ह्यातील अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती, विक्री करणारे, जुगार खेळणारे व अवैध वाळू उत्खनन वाहतूक करणाऱ्यांवर मासरेडचे आयोजन करून ३६ लाख ६० हजार ८५० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नांदेड जिल्ह्यातील अवैध व्यवसाय पूर्णतः बंद करण्यासंबंधाने अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणारे, जुगार खेळणारे व अवैध वाळू उत्खनन वाहतूक करणाऱ्या इसमांविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दि. २३ जून २०२६ रोजी मासरेडचे आयोजन केले होते. सदर मासरेडसाठी त्यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, सुरज गुरव यांच्यासह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड येथील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच सर्व पो.स्टे.चे प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी भाग घेतला होता. या मासरेड दरम्यान अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणारे, जुगार खेळणारे व अवैध रेती उत्खनन वाहतूक करणाऱ्या घटनास्थळी छापा टाकून समूळ उच्चाटन करण्यासाठी राबविलेल्या मोहिमेमध्ये नांदेड जिल्ह्यात एकूण ४१ गुन्हे दाखल केले. या प्रकरणी ४५ आरोपीतांवर कारवाई करून ३६ लाख ६० हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# मराठा सेवा संघाच्यावतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)** – मराठा सेवा संघाच्यावतीने शुक्रवार, दि. २६ जून रोजी राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

राजर्षी शाहू महाराज यांचा २६ जून हा जन्म दिवस महाराष्ट्रात सामाजिक न्याय दिवस म्हणून मानला जातो. त्या निमित्ताने शुक्रवार, दि. २६ जून रोजी राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्याजवळ अभिवादन करण्यासाठी मराठा सेवा संघाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सकाळी ९:३० वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड, वीर भगत सिंघ विद्यार्थी परिषद, संत गाडगेबाबा प्रबोधन कक्ष व ३३ कक्ष आणि इतर विविध परिवर्तनवादी संघटनेच्या वतीने अभिवादन करण्यात येणार आहे. तेव्हा नांदेड शहरातील नागरिकांनी या जयंती सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# छत्रपती चौक-कॅनाल रोड लगतच्या बसवेश्वर चौकातील बंद हायमास्ट दिव्यामुळे नागरिक त्रस्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील छत्रपती चौकालगत असलेल्या कॅनल रोडवरील बसवेश्वर चौकातील मुख्य सेंटरचा हायमास्ट (मोठा) दिवा गेल्या अनेक दिवसांपासून पूर्णपणे बंद अवस्थेत आहे. छत्रपती चौक आणि कॅनाल रोड परिसरातील मुख्य सेंटरच्या चौकात रात्रीच्या वेळी प्रचंड अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. या अंधाराचा गैरफायदा घेऊन परिसरात गुन्हेगारी आणि छेडछाडीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

बसवेश्वर चौकात दर बुधवारी आठवडी बाजार भरतो. बाजारामुळे येथे महिला आणि ग्राहकांची मोठी गर्दी असते. मात्र, दिवा बंद असल्याने रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेऊन चोऱ्या आणि लुटमारीचे प्रकार घडत आहेत. इतकेच नव्हे तर बाजार करून महिला आणि कामावरून उशिरा घरी परतणाऱ्या महिलांची छेडछाड होण्याच्या घटनाही वाढल्या आहेत. पहाटेच्या वेळी मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या नागरिकांना आणि महिलांनाही या अंधारामुळे सुरक्षेची भीती सतावत आहे. विशेष म्हणजे या समस्येबाबत नागरिकांनी चौकशी केली असता ग्रामपंचायत आणि नगरपालिका प्रशासन एकमेकांवर जबाबदारी ढकलत असल्याचे समोर आले आहे. प्रशासकीय हद्दीच्या वादामध्ये सामान्य नागरिकांची सुरक्षा वाऱ्यावर सोडली गेली आहे.

हद्दीचा वाद बाजूला ठेवून प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षेचा विचार प्राधान्याने करावा आणि बसवेश्वर चौकातील हा बंद असलेला मुख्य हायमास्ट लाईट तातडीने सुरू करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

# परदेश वारीचे आमिष दाखवून फसवणूक; पुण्याच्या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहराच्या हनुमानगड परिसरातील केशवेनगर भागात राहणाऱ्या काही मित्रांची परदेश पर्यटन करण्याचे आमिष दाखवून पुणे येथील दोघांनी एक लाख सात हजार रुपये घेऊन फसवणूक केली. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात त्यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केशवेनगर, हनुमानगड येथील रहिवासी अच्युत भीमराव कोमवाड (वय ७५) यांना आरोपी तन्मय चिट्टे व जयदीप श्रीरंग काशीकर राहणार पुणे यांनी भारत पर्यटन सेवा या टूर कंपनीचे एजंट असल्याचे भासविले. अच्युत कोमवाड व त्यांच्या मित्रास परदेश दौऱ्यावर घेऊन जाण्याचे आश्वासन देत दोघांनी संगनमताने १ लाख ७ हजार १०० रुपये स्वीकारले. मात्र, ठरल्याप्रमाणे कोणतीही पर्यटन सेवा न देता संबंधित रक्कम हडप केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही घटना १९ जानेवारी २०२६ ते ३१ मार्च २०२६ दरम्यान घडल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी अच्युत कोमवाड यांच्या तक्रारीवरून विमानतळ पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक साखरे करत आहेत.

# शहरात घरफोडीच्या २ घटना; सव्वादोन लाखांचा ऐवज लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील शिवाजीनगर आणि विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडीच्या दोन घटना उघडकीस आल्या असून, अज्ञात चोरट्यांनी एकूण २ लाख ५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये संबंधित पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नारायणनगर येथे २१ ते २४ जून दरम्यान सकाळी अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून प्रवेश केला. कपाटातील १ लाख ३५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली. याप्रकरणी शिवलक्ष्मी राजेश सोंडलू (वय ३६, रा. नारायणनगर) यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास पोलीस उपनिरीक्षक सय्यद करत आहेत. तर दुसरी घटना विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हरिओम नगर, तरोडा बुद्रुक येथे घडली. दि. १८ जून रोजी सायंकाळी ४ ते २४ जून रोजी सकाळी ६.३० वाजेदरम्यान अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून ७० हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास केली. याप्रकरणी सचिन किशोर जळकेकर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. तपास हवालदार सातारे करत आहेत.

# अमरावती-पुणे एक्सप्रेस हडपसरपर्यंत धावेल

**नांदेड (प्रतिनिधी)**– मध्य रेल्वेच्या पुणे विभागातील पुणे यार्ड येथे विद्यमान ट्रॅक संरचनेतील DDS पॉईंट क्रमांक २०७/२०८ बदलण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामासाठी आवश्यक वाहतूक व वीज ब्लॉक घेण्यात येणार असल्याने काही रेल्वे गाड्यांवर परिणाम होणार आहे.

यानुसार गाडी क्रमांक ११४०६ अमरावती-पुणे एक्सप्रेस दि. ४ जुलै २०२६ रोजी हडपसर स्थानकापर्यंतच चालविण्यात येईल. सदर गाडीचे पुणेपर्यंतचे संचालन रद्द राहील. दि. ४ जुलै रोजी सुटणारी ११४०६ अमरावती-पुणे एक्सप्रेस ही गाडी अमरावती ते हडपसर अशी धावेल.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी किसान मजदूर सभेचे आंदोलन



**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाचक अटी व शर्तीसह जाहीर केलेल्या कर्जमाफीमुळे केवळ दहा टक्के शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. त्यामुळे विना अटी, शर्ती सरसकट संपूर्ण कर्जमाफी करण्यात यावी यासह गायरान शासकीय जमिनी कास्तकारांच्या नावे करण्याच्या मागणीसाठी अखिल भारतीय किसान मजदूर सभेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गुरुवार, दि. २५ जून रोजी आंदोलन करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच शेतकरी कर्जमाफी जाहीर केली आहे. सदर शेतकरी कर्जमाफी योजना ही फसवी असून, जाचक अटी, शर्तीमुळे केवळ दहा टक्के शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे ही योजना जगाच्या पोशिंद्याच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार असून खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना दिलासा देण्याकरिता विनाअटी व शर्ती संपूर्ण शेतकरी कर्जमाफी करावी. तसेच पडीक शासकीय जमीन, जंगल व गायरान पट्टे कास्तकारांच्या नावे करण्यात यावेत. प्रत्येक भूमिहीन कुटुंबाला किमान पाच एकर जमीन द्यावी या मागणीसाठी अखिल भारतीय किसान मजदूर सभेच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात अखिल भारतीय किसान मजदूर सभेचे केंद्रीय सचिव कॉ. अशोक घायाळे, महाराष्ट्र अध्यक्ष पी. डी. वासमवार, सचिव मानेजी पाटील चोळाखेकर, नेमीचंद राठोड, भानुदास आडे, प्रकाश राठोड, गुलाब पवार, कपिल राठोड, चांदू झुंजारे, सतीश जाधव, संदीप जाधव, नितीन इबितवार यांच्यासह शेतकरी, शेतमजूर सहभागी झाले होते.

# विजयकुमार बेंबडे यांची निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या राज्य संघटकपदी नियुक्ती

**नांदेड (प्रतिनिधी)** – मुदखेड येथील सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूलचे मुख्याध्यापक तथा पर्यावरण वृक्षप्रेमी विजयकुमार बेंबडे यांची निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या राज्य संघटक पदावर नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. जागतिक पर्यावरणदिनाचे औचित्य साधून झालेल्या या निवडीमुळे शैक्षणिक, सामाजिक व पर्यावरण क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



गेल्या तीन दशकांहून अधिक काळ विजयकुमार बेंबडे हे पर्यावरण संवर्धन व वृक्षारोपण आणि सामाजिक, शैक्षणिक जनजागृती यांसाठी सातत्याने कार्यरत आहेत. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष स्व. वृक्षमित्र आबासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अनेक वर्षे पर्यावरण चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवला आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत मंडळाचे राज्याध्यक्ष प्रमोद मोरे व कार्यकारिणीने त्यांची राज्य संघटकपदी निवड केली आहे.

नियुक्तीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना विजयकुमार बेंबडे म्हणाले की, पर्यावरण संवर्धन ही आजच्या काळाची अत्यंत महत्त्वाची गरज आहे. पर्यावरण रक्षणाची चळवळ लोकचळवळ बनावी यासाठी अधिक जोमाने कार्य करणार आहे. शिक्षण आणि पर्यावरण या परस्परपूरक क्षेत्रांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती घडवून आणण्यावर विशेष भर दिला जाईल. सन २०२६ ते २०२९ या कालावधीत राज्यभर विविध पर्यावरणविषयक कार्यक्रम घ्यावयाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

बेंबडे यांच्या निवडीबद्दल प्रसिध्द साहित्यिक डॉ. जगदीश कदम, कवी नारायण शिंदे, सामाजिक कार्यकर्ते दिगंबरराव क्षीरसागर, निर्मल प्रकाशनाचे निर्मलकुमार सूर्यवंशी, प्रा. डॉ. कमलाकर चव्हाण, प्रा. श्रीहरी वेदपाठक, सी. ए. मनोहर आयलाने, सतीश भंडारे, लिंगराम हंडरगुळे, नरसिंग गुंडरे, श्रीकृष्ण राचमाळे, नागनाथ आकनगीरे, प्रा. संजीव रेड्डी यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# गणेशनगरवासीयांनी मानले मनपा व दैनिक गोदातीर समाचारचे आभार

**नांदेड (प्रतिनिधी)**– मागील एक महिन्यापासून गणेशनगर, विजयनगर व नांदेड हाउसिंग सोसायटी परिसरातील मुख्य रस्त्यावरील स्ट्रीट लाईट बंद होते. याबाबत स्थानिक रहिवाशांनी मनपा प्रशासनाकडे पथदिवे सुरू करण्यासंदर्भात मागणी केली होती. या मागणीची दखल घेत दैनिक गोदातीर समाचारने या समस्येवर आवाज उठवत 'गणेशनगर काळोखात : मनपाने लक्ष देण्याची मागणी' हे वृत्त प्रकाशित करुन जनतेच्या या प्रश्नाला वाचा फोडली होती.

काल या भागातील पथदिवे सुरू झाल्यानंतर गणेशनगर व विजयनगर परिसरातील अनेक नागरिकांनी सकारात्मक तत्परता दाखविल्याबद्दल नांदेड मनपा प्रशासनाचे तसेच संवेदनशील पत्रकारितेबद्दल दैनिक गोदातीर समाचारचे आभार मानले आहेत.

# नांदेडमध्ये २८ रोजी 'राज्यमाता गोमाता संवाद यात्रे'चे आयोजन



**नांदेड (प्रतिनिधी)** –पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र गोसेवा आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड जिल्ह्यात 'राज्यमाता गोमाता संवाद यात्रा २०२६' चे आयोजन रविवार, दि. २८ जून रोजी सायंकाळी ४ वाजता विसावा पॅलेस नाना नानी पार्क जवळ, शिवाजीनगर पोलीस स्टेशन शेजारी, नांदेड येथे करण्यात आले आहे.

या गोमाता संवाद यात्रेच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री अतुल सावे राहणार आहेत. तर मुख्य मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेखर मुंदडा हे मार्गदर्शन करणार आहेत.

या प्रसंगी विशेष अतिथी म्हणून माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, आ. हेमंत पाटील (राज्यमंत्री दर्जा), महापौर सौ. कविता मुळे, खा. डॉ. अजित गोपछडे, खा. प्रा. रवींद्र वसंतराव चव्हाण, खा. नागेश पाटील आष्टीकर, खा. डॉ. शिवाजीराव बंडप्पा काळगे, आ. विक्रम वसंत काळे, आ. सतीश भानुदास चव्हाण, आ. अमरनाथ राजूरकर, आ. बालाजीराव कल्याणकर, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, आ. भीमराव केराम, आ. डॉ. तुषार राठोड, आ. राजेश पवार, आ. जितेश अंतापूरकर, आ. आनंदराव बोंढारकर, आ. बाबूराव कदम कोहळीकर, आ. श्रीजया चव्हाण, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# पल्स पोलिओ मोहिमेसाठी तालुकाभर १५० बुथवर आरोग्य यंत्रणा सज्ज

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** –राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम रविवार, दि. २८ जून रोजी नायगाव तालुक्यात राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत तालुक्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील १८ हजारांहून अधिक बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यात येणार असून, एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, असे आवाहन नायगाव येथील तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीकांत पटवेकर व वैद्यकीय अधीक्षक अपर्णा पुपलवाड यांनी केले आहे.

नायगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील १६ हजार ६६७ तर शहरी भागातील १ हजार ४८१ बालकांपर्यंत पोहोचण्यासाठी एकूण १५० पोलिओ बुथ उभारण्यात येणार आहेत. अंगणवाडी केंद्रे, शाळा, बसस्थानके,



सार्वजनिक ठिकाणे व प्रमुख चौकांमध्ये ही केंद्रे कार्यरत राहणार आहेत. आशा सेविका, अंगणवाडी कर्मचारी, आरोग्य कर्मचारी व स्थानिक प्रशासनाची यंत्रणा मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सज्ज झाली आहे.

मोहिमेच्या अनुषंगाने आयोजित तालुकास्तरीय समन्वय बैठकीत तहसीलदार डॉ. धर्मप्रिया गायकवाड, गटविकास अधिकारी प्रवीण वानखेडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीकांत पटवेकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अपर्णा पुष्पलवाड तसेच नगर परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी गंधाली पवार यांनी तयारीचा आढावा घेतला.

आरोग्य विभागाने पालकांना विशेष आवाहन करताना सांगितले की, बालकाला यापूर्वी पोलिओचे डोस दिले असले तरी मोहिमेतील डोस घेणे तितकेच आवश्यक आहे. पोलिओ हा कायमस्वरूपी अपंगत्व निर्माण करणारा गंभीर आजार असून, लसीकरण हाच त्यावरील प्रभावी बचाव आहे.

दोन थेंब जीवनाचे या राष्ट्रीय अभियानात नागरिकांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवून आपल्या परिसरातील प्रत्येक बालकाला पोलिओचा डोस मिळेल यासाठी सहकार्य करावे. कोणत्याही अफवा किंवा गैरसमजांना बळी न पडता रविवारी जवळच्या पोलिओ बुथवर जाऊन बालकांना लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीकांत पटवेकर व वैद्यकीय अधीक्षक अपर्णा पुपलवाड यांनी केले आहे. पोलिओमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी प्रत्येक पालकाने जबाबदारीची जाणीव ठेवून या मोहिमेला यशस्वी करावे, असे प्रशासनाने म्हटले आहे.

पान १ वरून...

**शिवसेना खा. संजय दिना...**

राऊत यांना खूप मानसन्मान दिला. २००४ मध्ये शिवसेनेच्या लीलाधार डाके यांच्याविरोधात मी निवडून आलो तेव्हा संजय राऊत यांनी मला मदत केली. किरीट सोमय्या यांच्याविरोधातही त्यांनी मला मदत केली होती. ही शिवसेनेविरोधात गद्दारी नव्हती का? आम्ही पाच लोकं मारली, जे बोललो ती घटना माझ्या जन्मापूर्वीची आहे. मला दहा लोकं लागत नाहीत, मी लोकांच्या मनावर राज्य करतो. शिंदे साहेबांनी माझ्या वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली नाही, उलट मला शाबासकी दिली.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com